पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

शुक्रवार, दि. २७ जून, २०२५ | वर्ष : १३ | अंक : १७१ | पाने ८ | किंमत २ रुपये | www.janpravaslive.in | E-mail : dainikjanpravas@gmail.com

आतील पानात...

3 'हिंदी भाषेची सक्ती बिनडोक व कर्मदरिद्री

४ संत चरित्र वाचनाने वाचा शुद्ध होते : रामानंद गिरीजी महाराज

५ पाटस येथे धम्म यात्रेचे जोरदार स्वागत



पान ८ वर..

# राज्य शासनाने हिंदीचा हट्ट सोडावा : शरद पवार

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : देशातील बहुतांशी वर्ग हिंदी बोलतो. पण, मुले विशिष्ट वयात हिंदी किती आत्मसात करतील याचा विचार व्हावा. त्यामुळे प्राथमिक शिक्षणात हिंदी सक्तीचे नकोच. सरकारनेही पाचवीपर्यंतचा हिंदीचा हट्ट सोडावा, असा सल्ला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिला. त्याचबरोबर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांसाठी आघाडीची बैठक ३० जूनला होईल. त्यामध्ये एकत्रित निर्णय घेऊ, अशी माहितीही त्यांनी दिली.

शरद पवार म्हणाले, हिंदी विरोधापेक्षा प्रथम मी एआय (कृत्रिम बुध्दीमत्ता) पाहतो. कारण, एआयचे फायदे आहेत. सामान्य कुटुंबातील मुलांनाही एआयचे शिक्षण मिळावं याची काळजी घेतली पाहिजे. एआयचा शेती, उद्योग, शिक्षणातही फायदे आहेत. त्यामुळे केंद्र शासनानेही एआयला मान्यता दिलीय. राज्य शासनानेही ५०० कोटींची तरतूद केली आहे. शेतीचे उत्पादन वाढवायचे असेल तर एआयचा वापर व्हायलाच हवा. यामुळे शेतकऱ्यांवरील ओझेही कमी होईल. तसेच रयत शिक्षण संस्थेनेही एआय वापरासाठी पुढाकार घेतला आहे. याचाही उपयोग होणारच आहे.

राज्यातील शिक्षणात हिंदीला विरोध होत असल्याचा प्रश्न पत्रकारांनी केला. यावर पवार यांनी प्राथमिक



शिक्षणात हिंदी नको, असा सल्ला शासनाला दिला. तर महायुतीने आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची तयारी केली आहे. महाविकास आघाडीतील उद्धवसेनेचे पदाधिकारी स्वतंत्र लढण्याची भाषा करत आहेत, असा प्रश्नही पवार यांना विचारण्यात आला. यावर त्यांनी निवडणुकीबाबत आघाडीत चर्चा होणार आहे. बैठकीत निर्णय घेणार आहोत, असे उत्तर देत अधिक बोलणे टाळले. तर इस्त्रायल-इराण युध्दाबाबतही त्यांनी भारताला स्पष्ट भूमिका घ्यावी लागेल, असे मत मांडले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शक्तिपीठ महामार्गात राजकारण आणाल तर याद राखा, असा इशारा विरोधकांना दिला आहे. यावर प्रतिक्रिया देताना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी खोचक टोला लगावला आहे. ते म्हणाले, शक्तिपीठ महामार्गाचा विषय मला समजून घ्यायचा आहे. कोल्हा-पूरच्या लोकांबरोबर मी बोलणार आहे. त्यानंतर राज्य सरकारने आम्हा लोकांना त्याची माहिती देण्याची तयारी दाखवली तर तेही समजून घेण्याचा माझा विचार आहे. देवेंद्र फडणवीसांच्या धमकीमुळे आमची झोप उडाली आहे, आता आमचे कसे होणार? असा खोचक टोला लगावला आहे.

शक्तीपीठ' काय ते समजून घेणार; नंतरच बोलेन !

सातारचा दौरा करुन आपण कोल्हापूरला चालला आहात. सांगली-कोल्हापूरच्या शेतकऱ्यांनी संभाव्य शक्तीपीठ महामार्गाला विरोध केला आहे. यावर आपली भूमिका काय राहणार, असा प्रश्न पत्रकारांनी केल्यावर शरद पवार यांनी, हा प्रकल्प काय ते समजून घेईन. त्याची आवश्यकता आहे का ?. तसेच राज्य शासनानेही याबाबत माहिती दिली तर तीही घेईन. शेतकरी तसेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी यांचाही आग्रह समजून घ्यावा लागेल. विरोधासाठी विरोध नको. याबाबत सर्व समजून घेतल्यानंतरच मी बोलेन, असे स्पष्ट केले.

# सर्वांना समान न्याय मिळेल अशी कर रचना करणार : नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांसह महापालिकेच्या हद्दीत आधीपासून निवास करीत असलेल्या सर्व नागरिकांना समान न्याय मिळेल अशी मिळकत कर आकारणीची रचना केली जाईल असे आश्वासन नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.

पुणे महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी मिसाळ यांनी महापालिका प्रशासनाबरोबर आज बैठक घेतली होती. त्यानंतर त्या पत्रकारांशी बोलत होत्या. आयुक्त नवलकिशोर राम, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांची प्रमुख उपस्थिती होती.

मंत्री मिसाळ म्हणाल्या, ग्रामपंचायतीपेक्षा अधिक कर समाविष्ट गावातील



मिळकतधारांकडून आकारला जात असल्याची भावना या भागातील नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे समाविष्ट गावातून अपेक्षित महसूल संकलन होत नाही. सर्वांना समान न्याय मिळेल अशी कर रचना करणारा सविस्तर प्रस्ताव पुणे महापालिकेने राज्य शासनाकडे पाठवावा त्याला मंजुरी देण्यात येईल. मिसाळ म्हणाल्या, पुणे महापालिकेमध्ये नगरविकास खाते , समाज कल्याण खाते आणि पीएमपीएमएल खाते या अनुषंगाने आढावा बैठक घेतली आहे. पुण्यात दोन वर्ष पूरस्थिती होती त्यानुषंगाने आपत्कालीन व्यवस्था आढावा घेतला. केंद्र सरकारकडून आपत्कालीन व्यवस्थेसाठी ८० कोटी रुपये मंजूर झाले आहेत. मनपाने दोन प्रकल्प राबवणे ठरवले आहे. अमृत योजना अंतर्गत ड्रेनेजची कामे चांगल्या प्रकारे करण्यात होत आहेत. नवीन सहा एसटीपी प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. एकूण दहा एसटीपी करण्यात येणार आहेत. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत साडेचार हजार घरे बांधणे प्रस्तावित आहे.त्यासाठी काही गायराने जागा देखील पाहणे सुरू आहे.

## संक्षिप्त

### सरकारी जमीन वापरण्याचा हक्क सरकारलाच

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : ठाण्यातील मोघरपाडा येथील १७४.७६ हेक्टर जमीन एमएमआरडीएला एकात्मिक मेट्रो कार डेपोसाठी देण्याबाबतच्या राज्य सरकारने काढलेल्या अधिसूचनेच्या वैधतेला आव्हान देणारी याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली. ही जमीन राज्य सरकारची आहे आणि कायद्यानुसार वापरण्याचा अधिकार सरकारलाच आहे, असे न्यायालयाने नमूद केले. सरकारचा निर्णय कोणत्याही प्रकारे मनमानी आहे किंवा विचार न करता घेतलेला आहे, असे म्हणता येणार नाही. संबंधित जमीन हस्तांतरीत करण्याचा निर्णय हा सार्वजनिक हितासाठी, एकात्मिक मेट्रो कार शेड डेपो उभारण्यासाठी घेतला गेला आहे. त्यामुळे या याचिकेला कोणताही कायदेशीर आधार नाही, त्यामुळे ही याचिका फेटाळण्यात येत आहे, असे मुख्य न्या. आलोक आराधे व न्या. संदीप मारणे यांच्या खंडपीठाने नमूद केले.

खारभूमी कृषी समन्वय समितीने ही याचिका केली होती. मोघरपाडा येथे उभारण्यात येणारी मेट्रो कार शेड हे मेट्रो लाइन ४, ४ ए, १० आणि ११ साठी मुख्य देखभाल व संचालन केंद्र म्हणून कार्यरत असेल. याचिकाकर्ते जमिनीचे मालक नाहीत. परंतु, अनेक दशकांपासून शेतीचा ताबा असलेले भाडेपट्टेदार आहेत. त्यामुळे मेट्रोला जमीन देण्याचा निर्णय मनमानी आहे, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी केला.

### शक्तीपीठ विरोधात जलसमाधी आंदोलनाचा इशारा

जनप्रवास । प्रतिनिधी

सोलापूर : राज्य शासनाने शक्तीपीठ महामार्गासाठी मंजुरी दिलेली असतानाच या महामार्गाला शेतकऱ्यांमधून विरोध होत आहे. सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील जवळगाव मध्यम प्रकल्पात एक जुलैला सामूहिक जलसमाधी आंदोलन केले जाणार असल्याची माहिती धरणग्रस्त शेतकरी दिलीप जाडकर यांनी दिली. बार्शी तालुक्यातील जवळगाव मध्यम प्रकल्पाचे धरणग्रस्त शेतकरी सध्या गंभीर संकटाला सामोरे जात आहेत.

## पिंपरी-चिंचवडमध्ये टोळक्याने धुडगूस घालत नऊ वाहनांच्या काचा फोडल्या

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड: पिंपरी-चिंचवडमध्ये वाहन तोडफोडीचे सत्र सुरूच आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील वाल्हेकरवाडी परिसरात मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात टोळक्याने रस्त्यावर पार्क केलेल्या वाहनांची तोडफोड केली आहे. या प्रकरणी गुन्हे शाखेच्या पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेतलं आहे.

चिंचवड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वाल्हेकरवाडी परिसरात सहा चारचाकी आणि तीन रिक्षांना लक्ष करत काचा फोडल्या आहेत. सिमेंटच्या गट्टूने वाहनांची तोडफोड करण्यात आली. ही घटना मध्यरात्री अडीचच्या सुमारास घडली असल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन हिरे यांनी दिली आहे. वाहन



तोडफोडीचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. पाच जणांच्या टोळक्याने ही तोडफोड केल्याची माहिती त्यांनी दिली आहे. पाच जणांपैकी दोघांना अटक करण्यात पोलिसांना यश आल आहे. इतर तिघांचा शोध पोलीस घेत आहेत.

## सार्वजनिक ठिकाणांच्या सीसीटीव्हीसाठी धोरण तयार होणार

**– आ. सिद्धार्थ शिरोळे**

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : सार्वजनिक ठिकाणी असलेल्या सीसीटिव्हींसाठी आता धोरण तयार होणार आहे. त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेसह पोलिस, सार्वजनिक बांधकाम तसेच अन्य सरकारी यंत्रणांची समिती स्थापन करण्याचा निर्णय यासंबधी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यासमवेत मुंबईत झालेल्या बैठकीत घेण्यात आला. आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी विधानसभेतील चर्चेदरम्यान हा विषय उपस्थित केला होता.

कदम यांनी त्याचवेळी शिरोळे यांना हा विषय महत्वाचा असून



यावर विचार करण्याचे आश्वासन दिले होते. त्याप्रमाणे मुंबईत ही बैठक झाली असल्याची माहिती आमदार शिरोळे यांनी दिली. सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही बसवण्यात येतात, मात्र ते बसवल्यानंतर त्याची देखभाल दुरूस्ती, चित्रिकरण यावर कोणाचेही नियंत्रण नसल्याचा मुद्दा शिरोळे यांनी उपस्थित केला होता.

मुंबईत झालेल्या बैठकीत यावर चर्चा झाली. त्यामध्ये सीसीटीव्ही चे नियंत्रण स्थानिक पोलिसांकडे द्यावे, ठेकेदार कंपनीला किमान ५ वर्षांची देखभाल दुरूस्ती बंधनकारक ठेवावी, स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या प्रतिनिधींचा समावेश असावा अशा अनेक मुद्द्यांचा समावेश होता असे शिरोळे यांनी सांगितले. सध्या जिथे असे सीसीटीव्ही बसवले आहेत, त्यातील अनेक ठिकाणचे कॅमेरे बंद आहेत, त्याचे चित्रिकरण होत नाही, झाले असेल तर ते मिळत नाही, त्यावरचे फुटेज कोणाकडे असावे याबाबतीत निश्चित धोरण नाही अशा अनेक गोष्टी या चर्चेदरम्यान पुढे आल्या.

शिरोळे यांनी त्यावेळी राज्यातील सर्वच सावर्जनिक ठिकाणांच्या सीसीटीव्ही संबधी स्वतंत्र धोरण ठरवले जाण्याची गरज व्यक्त केली. यामुळे गुन्हेगारी स्वरूपांच्या कृत्यांवर नियंत्रण राहिल, तरीही गुन्हे झालेच तर सीसीटीव्ही चित्रिकरणामुळे गुन्हेगार उघड होतील असे सांगितले गृहराज्यमंत्री कदम यांनी ते मान्य करून धोरण ठरवण्यासाठी स्वतंत्र समितीची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. गृहविभागाचे प्रधान सचिव अनुप कुमारसिंग तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

## बदनामीकारक फलक लावल्याप्रकरणी कारवाईची मागणी

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : पुणे रेल्वे स्थानकाच्या नामांतराची मागणी केल्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या राज्यसभेतील खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांच्याविषयक बदनामीकारक मजकूर असलेले फलक लावण्यात आले आहेत. शहरात अशा प्रकारचे फलक लावणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याबाबत महाराष्ट्र ब्राह्मण सभेच्या महिला प्रदेशाध्यक्ष विद्या घटवाई यांनी राज्य महिला आयोगाकडे तक्रार अर्ज दिला आहे. डॉ. कुलकर्णी यांनी पुणे रेल्वे स्थानकाचे नाव बदलावे. रेल्वे स्थानकाला थोरले बाजीराव पेशवे यांचे नाव देण्याची मागणी त्यांनी केली होती. त्यानंतर कुलकर्णी यांच्याविषयी बदनामीकारक मजकूर असलेले फलक शहरात लावण्यात आले आहेत. लोकप्रतिनिधींची बदनामी केल्याप्रकरणी कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

## लोहगावमध्ये गांजा विक्री प्रकरणी एकजण गजाआड; १२ किलो गांजा जप्त

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : लोहगाव परिसरात गांजा विक्रीसाठी आलेल्या एकाला विमानतळ पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून तीन लाख रुपयांचा १२ किलो गांजा जप्त करण्यात आला. अखिलेश गरीब मंडल (वय ३४, रा. लोहगाव) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी त्याच्याविरुद्ध अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोहगावमधील कर्मभूमीनगर परिसरात एकजण थांबला असून त्याच्याकडे गांजा असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक नितीन राठोड यांना मिळाली. त्यानंतर तपात पथकाने सापळा लावून त्याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेण्यात आली. तेव्हा त्याच्याकडील कापडी पिशवीत सुमारे १२ किलो गांजा सापडला, जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत तीन लाख रुपये आहे. मंडल हा बांधकाम मजूर आहे. त्याने गांजा कोठून आणला, यादृष्टीने पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे.

## माऊलींच्या पादुकांना निरा स्नान



### विठू माऊलीच्या जयघोषात पालखीचा सातारा जिल्ह्यात प्रवेश

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : 'ग्यानबा-तुकाराम' नामाचा जयघोष करीत, टाळ-मृदंगाच्या गजरात नीरा नदीच्या पवित्र तीर्थात गुरुवारी माऊलींच्या पादुकांना शाही स्नान घालण्यात आले. नीरा स्नानानंतर माऊलींच्या पालखी सोहळ्याने पुणे जिल्ह्याचा निरोप घेतला. माऊलींचा पालखी सोहळा सुरु करणाऱ्या हैबतबाबांच्या जन्मभूमी असलेल्या सातारा जिल्ह्यातील लोणंद मुक्कामासाठी रवाना झाला. तत्पूर्वी नीरा नदीच्या पवित्र पात्रात माऊलींच्या पादुकांना स्नान घालण्यात आले. यावेळी उपस्थित माऊली भक्तांनी माऊली माऊलीचा जयघोष करत टाळ मृदुगांच्या आवाजाने नीरा नदीच पात्र दुमदुमून सोडलं.

माऊलींच्या पालखी सोहळ्यात नीरा स्नानाला परंपरागत महत्त्व आहे. पालखी सोहळ्यातील अर्धा टप्पा पुर्ण झाल्यावर माऊलींचा सोहळा सुरु करणाऱ्या हैबतबाबांची जन्मभुमी असलेल्या सातारा जिल्ह्यात प्रवेशापूर्वी माऊलींच्या पादुकांना पुणे व सातारा जिल्हाची सीमा असलेल्या नीरा नदीच्या प्रसिद्ध दत्त घाटावर माऊलींच्या पादुकांना स्नान घातले जाते. यासाठी हजारो भाविक उपस्थित असतात.

दुपारी दोन वाजून वीस मिनिटांनी पालखी सोहळ्याने जुन्या नीरा पुलावरून दत्त घाटावर प्रवेश केला टाळ व मृदुगाच्या जयघोषा बरोबर माऊलींच्या पादुका स्नानासाठी फुलांच्या पायघड्या घातल्या होत्या माऊलींच्या स्वागतासाठी रांगोळी बरोबर वाद्यांचा निनाद सुरू होता पालखी सोहळ्याच्या मानकऱ्यांच्या हस्ते माऊलींच्या पादुकांना स्नान घातले गेले यानंतर प्रशासना तर्फे पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यात आले.

पादुकांना शाही स्नान घालून माऊलींच्या पादुकांना चंदन उटी व तुळशीहार अर्पण करून पाद्य पूजन करण्यात आले यानंतर सोहळा लोणंद मुक्कामी मार्गस्थ झाला. परंपरे प्रमाणे नीरा नदीकाठी विसावा घेतल्यानंतर माऊलींच्या पादुकांचे दत्त घाटावर शाही स्नान सुरू होते. भक्तांचेही स्नान झाले व सोहळ्याला नवी ऊर्जा मिळाली.

## महापालिका निवडणुकांना २०२६ उजाडणार?

### आधी जिल्हा परिषदा मग महापालिकेची निवडणूक

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : महापालिकांच्या प्रभागरचनेचा कार्यक्रम लांबल्याने निवडणुकाही लांबणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यात राज्यात आधी जिल्हा परिषदा, पंचायती समित्या, त्यापाठोपाठ नगरपरिषदा आणि त्यानंतरच महापालिकांच्या निवडणुका घेण्याच्या हालचाली सुरू असल्याने महापालिकांच्या निवडणुकीसाठी जानेवारी २०२६ हे नवीन वर्ष उजाडण्याची शक्यता प्रशासकीय वर्तुळातून व्यक्त केली जात आहे.

सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांच्या आत घेण्याचे



आदेश दिले आहेत. त्यानुसार राज्यातील २७ महापालिकांच्या निवडणुकांसाठी नव्याने प्रभागरचना करण्याची प्रक्रिया शासनाच्या निर्देशानुसार सुरू करण्यात आली आहे. यासंदर्भात दि. १० जूनला राज्य शासनाने काढलेल्या आदेशानुसार, येत्या ४ सप्टेंबरपर्यंत अंतिम प्रभागरचना जाहीर होणार होती, आता मात्र शासनाने काढलेल्या सुधारित आदेशानुसार अंतिम प्रभागरचना जाहीर करण्यासाठी दि. १६ ऑक्टोबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे आता चार महिन्यांत निवडणुका होऊ शकणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, ऑक्टोबरमध्ये अंतिम प्रभागरचना जाहीर झाल्यानंतर त्यावरील आरक्षण सोडत आणि हरकती-सूचनांची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ऑक्टोबरअखेर उजाडणार असल्याचे स्पष्ट आहे.

मोरेश्वर सभागृह
Nishigandha Banquets
Snehal Tamhankar | Swapnali Gokhale (Amit Caterers)
17B/3 Near Joshi Railway Museum, Kothrud, Pune 411 038
020 25460269
+91 9156172004
info@moreshwarsabhagruha.com
www.moreshwarsabhagruha.com

# अग्रलेख : जबरदस्तीचा ‘शक्तिपीठ’ महामार्ग कशासाठी?

शेतकऱ्यांचा विरोध असलेल्या पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ‘ड्रीम प्रोजेक्ट’ असलेल्या शक्तिपीठ महामार्गासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यासाठी मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत शक्तिपीठ महामार्गाच्या प्रकल्पाला गती देण्यासाठी २० हजार ७८७ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, मंत्रिमंडळ बैठकीतच या निर्णयावर महायुतीच्या नेत्यांनी नाराजी व्यक्त केली. महामार्गासाठी जमीन संपादन करण्याआधी बाधितांना आर्थिक मोबदला, पर्यायी जागा याबाबत सरकारने स्पष्ट करावे, अशी मागणी महायुतीतील दोन मंत्र्यांनी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत लावून धरली.

शक्तिपीठ मार्ग हा राज्याच्या विकासाला चालना देणारा असून राज्याच्या पूर्वेकडील पवनार (वर्धा) येथून पश्चिमेकडील पत्रादेवी (सिंधुदुर्ग) या महाराष्ट्र-गोवा सीमेला जोडणारा आहे. मंत्रिमंडळ बैठकीत नुकतीच ‘महाराष्ट्र शक्तिपीठ महामार्ग’ प्रकल्पाला मान्यता देण्यात आली. मात्र कोल्हापूरचे मंत्री प्रकाश आबिटकर आणि हसन मुश्रीफ यांनी या प्रकल्पासंदर्भात सरकारने पुनर्विचार करून निर्णय घेण्याची विनंती केली. लोकसभा निवडणुकीत सांगली-कोल्हापूर भागात महायुतीला बसलेला फटका लक्षात घेता, पुन्हा त्याच भागात शेतकऱ्यांचा रोष ओढवून घेणे, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सरकारला धोकादायक ठरू शकते असे मत दोन्ही मंत्र्यांनी व्यक्त केले.

वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर व सिंधुदुर्ग अशा राज्यातील एकूण १२ जिल्ह्यांना जोडणारा शक्तिपीठ महामार्ग ८०२.५९२ किमी लांबीचा असून तो समृद्धी महामार्गापेक्षाही जास्त लांबीचा आहे. शक्तिपीठ महामार्गाला शेतकऱ्यांचा विरोध कायम आहे. मात्र तरीही हा प्रकल्प रेटून नेण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे. या महामार्गामुळे माहूर, तुळजापूर, कोल्हापूर तसेच अंबाजोगाई ही राज्यातील प्रमुख तीर्थक्षेत्रे जोडली जाणार आहेत. संतांची कर्मभूमी असलेले मराठीचे आद्यकवी अंबाजोगाईस्थित मुकुंदराज स्वामी, जोगाईदेवी तसेच १२ ज्योतिर्लिंगांपैकी औंढा नागनाथ व परळी वैजनाथ, महाराष्ट्राचे आराध्य दैवत पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर यासह कारंजा-लाड, अक्कलकोट, गाणगापूर, नरसोबाची वाडी, औदुंबर ही दत्तगुरूंची धार्मिक स्थळे जोडली जाणार आहेत. या महामार्गामुळे नागपूर ते गोवा हे १८ तासांच्या प्रवासाचे अंतर ८ तासांवर येणार आहे. महामार्गाला कोल्हापुरातील मंत्र्यांनी विरोध दर्शविल्याने जिल्ह्याला ‘वळसा’ घालून प्रकल्प राबविण्याबाबत विचार सुरू झाला. मात्र, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून कोल्हापूरकरांची नाराजी तूर्त दूर करण्याचा प्रयत्न असल्याची चर्चा आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची कमाल जमीन धारणा कमी आहे. नागपूर-रत्नागिरी हा पर्यायी मार्ग अस्तित्वात असल्यामुळे शेतकरी सुपीक जमीन देण्यास तयार नाहीत. शक्तिपीठ महामार्गात शेतकऱ्यांची सुपीक जमीन जाणार असल्याने शेतकऱ्यांचा याला कडाडून विरोध आहे. सांगली जिल्ह्यातील शेटफळेसह अनेक ठिकाणी या महामार्गाचे सर्वेक्षण ठिकठिकाणी रोखण्यात आले होते. माजी खासदार राजू शेट्टी आणि माजी मंत्री सतेज पाटील यांनी शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहत मोठे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. मंत्रिमंडळ बैठकीत या महामार्गासाठी आर्थिक तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी हुडकोकडून १२ हजार कोटींचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे. या निधीतून सुमारे ७ हजार ५०० हेक्टरचे भूसंपादन केले जाणार आहे. हा संपूर्ण प्रकल्प महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळामार्फत राबवण्यात येणार आहे. राज्य मंत्रिमंडळाने राज्यातील तब्बल १८ तीर्थक्षेत्रांना जोडणारा शक्तिपीठ महामार्ग प्रकल्प मंजूर केला आहे. हा प्रकल्प नागपूर आणि गोवा या दोन महत्त्वाच्या ठिकाणांना जोडणारा आहे. महाराष्ट्रात एकूण साडेतीन शक्तिपीठे आहेत. यापैकी नाशिक जिल्ह्यातील सप्तशृंगी देवीचे शक्तिपीठ वगळता इतर तीन शक्तिपीठांना हा महामार्ग प्रकल्प जोडणार आहे. कोल्हापुरातून नागपूर-रत्नागिरी महामार्ग गेला आहे. तो प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गाला समांतर आहे. त्यामुळे पुन्हा शक्तिपीठ महामार्गाला जमीन देण्यास शेतकऱ्यांचा विरोध आहे.

हा विरोध दिवसेंदिवस वाढत असल्याने सद्यस्थितीत कोल्हापुरात भूसंपादन करू नये. नागपूर-रत्नागिरी महामार्गाचे रुंदीकरण करून शक्तिपीठ महामार्ग या महामार्गाला जोडावा. ज्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीही जाणार नाहीत आणि वाहतुकीला अडथळाही निर्माण होणार नाही, अशी भूमिका आबिटकर आणि मुश्रीफ या मंत्र्यांनी घेतल्याचे सांगितले जाते. उभय मंत्र्यांच्या भूमिकेमुळे मुख्यमंत्र्यांनी नागपूर-रत्नागिरी महामार्गाचे रुंदीकरण करून शक्तिपीठ महामार्ग या महामार्गाला जोडण्याचा पर्याय खुला ठेवला असून मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि संबंधित मंत्री यांच्या संयुक्त बैठकीत याबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे सांगितले जाते. कोल्हापूरमध्ये भूसंपादनाला होणारा विरोध लक्षात घेता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सावध पवित्रा घेतला आहे. भूसंपादनासाठी कोणावरही जबरदस्ती केली जाणार नाही. चर्चेतून मार्ग काढला जाईल असे शिंदे म्हणाले. कोल्हापूरमध्ये शिवसेनेची संघटनात्मक ताकद वाढवण्यावर शिंदे यांचा भर असल्याने त्यांनी काहीशी मवाळ भूमिका घेतल्याचे बोलले जाते. शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधातील लढा यापुढेही चालूच राहील, असे आमदार सतेज पाटील व शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी जाहीर केले आहे. शक्तिपीठ जोड मोहिमेची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली होती. ती प्रत्यक्षात आणण्याचे प्रयत्न त्यांचे चेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करणार हे उघड आहे. त्याशिवाय ‘शायनिंग इंडिया’ सत्यात कसे उतरेल?

# हिंदी सक्तीतून सर्व भाषिकांत विषाचा खडा

## राजकारण

### उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा महायुतीला टोला



मुंबईमध्ये हिंदी भाषेच्या सक्तीवरून राजकीय वातावरण तापले आहे. मनसेनंतर आता शिवसेना उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही या निर्णयाला विरोध दर्शवला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर त्यांनी निशाणा साधला. शिक्षण क्षेत्रात ते विष कालवत असल्याचा आरोप त्यांनी केला. या सक्तीमागे भाजपचा छुपा अजेंडा असल्याचा संशय उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला.

हिंदी भाषा सक्तीचा विषय आता पेटताना दिसत आहे. मनसे पाठोपाठ आता ठाकरे सेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी त्याला विरोध करत मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. उद्धव ठाकरेंनी या भाषा शक्ती वरून बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एका शिंदे यांच्यावर निशाणा साधला आहे. सर्व शिक्षकांमध्ये ते मिठाचा नाहीतर विषाचा खडा टाकत असल्याचं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

हा विषय पाच मिनिटांमध्ये संपणार नाही. मुख्यमंत्र्यांनी जर जाहीर केलं की, मी माझ्या राज्यामध्ये हिंदीची सक्ती करणार नाही किंवा होऊ देणार नाही त्याच्यासाठी सादरीकरण करण्याची गरज नाही. हे दळण कशासाठी दळताय. भाजपने जी काही घोषणा केली होती बटेंगे तो कटेंगे तर आता बाटेंगे तो कटेंगे आणि काटेंगे असं त्यांचं धोरण दिसत आहे. सर्व भाषिकांमध्ये मिठाचा नाहीतर विषाचा खडा ते टाकत आहे. आम्ही हिंदी भाषेला विरोध केलेला नाही तर हिंदी सक्तीला विरोध केलेला असल्याचं उद्धव ठाकरे म्हणाले.

आता ते भाषिक आणीबाणी लादत आहेत. याचा विरोध आम्ही करणार आहोतच पण विशेष म्हणजे शिवसेनेतील गद्दार जे तिकडे मिंधेपणाने राहत आहेत, त्यांना सुद्धा बाळासाहेबांचे विचार काय आहेत हे मराठीतून सांगण्याची वेळ आली आहे. आम्ही कोणतीही सक्ती स्वीकारणार नाही ना कोणतीही जबरदस्ती लागून घेणार नाही. नको म्हणजे नको, हिंदी शिकली नाही म्हणजे आम्हाला कोणाला हिंदी येत नाही असं नाही. आपला देश हा संघराज्य पद्धतीचा आहे. आपल्या देशाची मांडणी ही भाषावार प्रांतरचना झाली आहे. प्रत्येक भाषेनुसार प्रत्येक प्रांत मिळाला आहे. मी मुख्यमंत्री असताना मला नाईलाजाने मराठी भाषेची सक्ती करावी लागली होती. कारण हे लोक मराठी भाषेवर अतिक्रमण करत होते. दुकानाच्या पाट्या मराठीत पाहिजे, मराठी भाषा ही व्यवहारात आली पाहिजे, पण याविरोधातही काही लोक कोर्टात गेले होते. त्रिकोणाच्या पाठीराखे होते आता उघड झालं आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

जर भाषेला विरोध असता तर हिंदी चित्रपटसृष्टी मी चुकत नसेल तर मुंबईत जन्मली पण एक नक्की या हिंदी चित्रपट सृष्टीचे पालन मुंबई आणि महाराष्ट्र ने केले. मग अमिताभजी असतील किंवा हिंदी इतर कलाकार गायक असतील हे मुंबईमध्ये येऊनच मोठे झाले. आम्हाला हिंदीचं वावडं नाही पण हिंदी सक्तीची म्हणजे याचा अर्थ तुमचा छुपा अजेंडा आहे की एक दिशा एक प्रधान आणि एक विधान. नड्डाही बोलले होते की, देशात एकच पक्ष राहणार म्हणजे हे सगळं एकाधिकारशाहीकडे चाललं असल्याचं म्हणत भाजपवर ठाकरेंनी टीका केली.

### भाजपकडून भाषिक आणीबाणी लादली जाते आहे

उद्धव ठाकरे म्हणाले, आमचा विरोध हिंदी भाषेला नाही तर हिंदी सक्तीला आहे. हिंदीला विरोध नाही कारण हिंदी चित्रपटसृष्टी मुंबईतच जन्माला आली. अमिताभ बच्चन यांच्यासह सर्वच हिंदी कलाकार, गायक, निर्माते असतील हे मुंबईत आले आणि मोठे झाले. हिंदी सिने तारे-तारका इथे येऊन मोठी होतात. पण जसा देश तसा वेश, तशी भाषा हे सर्वांना मान्यच करावे लागेल. असे असताना हिंदीच्या माध्यमातून भाजपाची एकाधिकारशाहीकडे वाटचाल सुरू आहे. आणीबाणी लादल्याचा विषय भाजपाने आणला होता. आणिबाणीला ५० वर्षे झाल्याच्या निषेधार्थ त्यांनी विरोध दर्शवला. पण आता तेच भाषिक आणीबाणी लादत आहेत.

## अंतरंग

### भारताचे अवकाशात धाडसी पाऊल

भारताने आपल्या अंतराळ संशोधनात पुन्हा एक नवे पाऊल ठेवून इतिहास रचला आहे.



भारतीय वायूसेनेत पायलट असलेल्या सुधांशु शुक्ला यांनी एक्सीओम - ४ या मिशनच्या अंतर्गत चौदा दिवसांच्या अंतराळ यात्रेसाठी उड्डाण केले. भविष्यकाळात तयार होणाऱ्या अंतराळ स्थानके म्हणजे स्पेस स्टेशनसाठीदेखील ही मोहीम महत्त्वाची आहे. नासा आणि एक्सीओम कंपनीच्या सहकार्याने मोहीम राबवली गेली. या चौदा दिवसांच्या काळात अंतराळ विषयक विशिष्ट अभ्यास सुधांशु आणि त्यांच्याबरोबर असलेले अंतराळ यात्री करणार आहेत. आतापर्यंत भारताने अंतराळात अनेक प्रकारचे उपग्रह प्रक्षेपित करण्यात बराच लौकिक मिळवला. चांद्रयान २ च्या मोहिमेने तर भारताच्या अंतराळ संशोधनात नवे चार चांदच जोडले गेले होते. परंतु आता थेट दुसरा अंतराळ यात्री पाठवून या दिशेने पुढचे मोठे पाऊल टाकले आहे. यापूर्वीच्या चंद्रमोहिमेत राकेश शर्मा या भारतीय अंतराळ वीराने यशस्वी प्रवास केला होता. आता अंतराळातल्या वेगवेगळ्या घडामोडींचा अभ्यास करण्यापासून तर अंतराळात स्थापन होऊ घातलेल्या अंतराळ स्टेशनची यशस्वीतता सिद्ध करण्यापर्यंत बऱ्याच गोष्टी घडून येणार आहेत. भारताने या मोहिमेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला आणि वायूदलातल्या सुधांशु शुक्ला यांची निवड केली गेली. गेले वर्षभर यासंदर्भातला अभ्यास सुरू होता. यापूर्वी हे अंतराळ यान प्रक्षेपित करण्याची तारीख वारही नक्की झाली होती. परंतु काही तांत्रिक कारणांमुळे सुधांशु शुक्लांचे अंतराळ यान झेपावू शकले नव्हते.

सुधांशु शुक्ला यांचे हे केवळ अंतराळ पर्यटन नसून भारताने सुरू केलेल्या गगनयान मोहिमेचाही तो एक मोठा भाग मानला गेला आहे. भारताने सुरू केलेल्या अभ्यास आणि संशोधनाच्यादृष्टीने गगनयान हीसुद्धा खूप मोठी आणि आव्हानात्मक मोहीम आहे. ज्यामध्ये भविष्यकाळात भारताला स्वतःचे अंतराळवीर पाठवता येणार आहेत. एवढेच नव्हे तर जगातील नासासारख्या संस्थांकडून उभारल्या जात असलेल्या अंतराळ स्थानकांच्या स्पर्धेत विलक्षण स्वरुपाचा तर आहेच. सुधांशु शुक्ला यांचे हे धाडसी पाऊल गगनयान मोहिमेचाही एक मोठा भाग आहे. भारताने सुरू केलेल्या अभ्यास आणि संशोधनाच्यादृष्टीने गगनयान हीसुद्धा खूप मोठी आणि आव्हानात्मक मोहीम आहे. ज्यामध्ये भविष्यकाळात भारताला स्वतःचे अंतराळवीर पाठवता येणार आहेत. एवढेच नव्हे तर जगातील नासासारख्या संस्थांकडून उभारल्या जात असलेल्या अंतराळ स्थानकांच्या स्पर्धेतही भारताला स्थान मिळवता येऊ शकते. त्याला कदाचित पुढची पाच दहा वर्षे लागतील. परंतु भारताने स्वतःच्या संशोधनातून स्थापन केलेले अंतराळ स्थानक ही तितकीच मोठी मजल ठरू शकते.

अंतराळ अभ्यासाचा एक नवा अध्याय त्यातून उघडला जाऊ शकतो. आतापर्यंत अमेरिका, रशिया, चीन यासारख्या मोजक्या देशांचीच या मोहिमेत मक्तेदारी होती. परंतु भारताने केलेला हा चंचुप्रवेश म्हणजेच विकसित राष्ट्रांच्या पंक्तीत झालेला समावेश ठरतो. भारताने दाखवलेली उत्सुकता हेदेखील एक धाडसच मानले पाहिजे. अमेरिका, रशिया, चीन, यासारखे देश अंतराळ मोहिमांचा विचार करताना भारतालासुद्धा विचारात घेऊ शकतात. त्याच उद्देशातून सुधांशु शुक्लांची निवडही झाली आणि त्यांनी वर्षभराचे प्रशिक्षणही यशस्वीरीत्या पूर्ण केले होते. आतापर्यंतच्या भारताचा अंतराळ क्षेत्रातला दबदबा यानिमित्ताने निश्चितच वाढीला लागला आहे यात काही शंका नाही. लखनऊमध्ये राहाणाऱ्या शुक्ला कुटुंबीयांसाठी हा क्षण भावनिक परंतु तितकाच अभिमानाचा ठरला आहे. वायूदलातला प्रचंड मोठा अनुभव सुधांशुकडे आहे. सुखोईसारखे विमान उडवण्याचा २000 तासांचा त्यांच्याकडे असलेला अनुभव म्हणजे आकाशातल्या आव्हान आणि भाइमाशी त्यांनी केलेली मैत्रीच ठरते. वायुदलातला कॅप्टन म्हणून असलेला अनुभव हा नोकरीचा भाग असतो. त्याच दृष्टिकोनातून शुक्ला कुटुंबाच्यादृष्टीने सुधांशुंचा हा अंतराळ प्रवास उत्सुकता, उत्साह आणि बारीकशी चिंता निर्माण करणाराही ठरतो. परंतु या मोहिमेने सुधांशुचे जगभर झालेले नाव आणि भारताचा तिरंगा घेऊन अंतराळात भारताचेही स्थान निर्माण करण्याची त्याला मिळालेली संधी याविषयीदेखील तितकेच मोठे समाधान वाटते आहे. अमेरिकेतल्या बऱ्याच खाजगी कंपन्या या क्षेत्रात उतरल्या आहेत. भारतातही या प्रयोगाला सुरुवात होत आहे. ज्या पृथ्वीवर आपण राहतो तिला लाखो मैलांवरून पाहाणे आणि आपल्याभोवती फिरणाऱ्या इतर ग्रह ताऱ्यांचेही निरीक्षण करणे हादेखील या पर्यटनाचा एक थरारच म्हणता येतो. **- स्मिता कोठावळे**

## पंचांग

विक्रम संवत्- २०८१ आषाढ शके संवत्- १९४७ संवत्सर - विश्वावसूनाम अयन- दक्षिणायान मास- आषाढ ऋतु- सौर ग्रीष्म
शुक्ल पक्ष तिथि : द्वितीया ११ : १९ : ३९ नक्षत्र : पुनर्वसु ०७ : २१ : ४३ योग : व्याघात २१ : ०९ : ५१ करण : कौलव ११ : १९ : ३९ करण : तैतिल २२ : ३१ : ३२
सूर्य : मिथुन चन्द्र : कर्क ०१ : ३९ : ३५ हिजरी सन् - १४४६
मुस्लिम मास - मोहरम तारीख - १ विशेष रथयात्रा मुस्लीम नूतन वर्षारंभ हिजरी सन १४४७ प्रारंभ मुस्लीम मोहरम मासारंभ

## राशी भविष्य...

**मेष** - महिलांनी मौल्यवान वस्तूची घेतलेली काळजी हितकारक ठरेल. वाचनातून नवे काही शिकायला मिळेल. आपण घेतलेले निर्णय योग्य राहतील. सामाजिक प्रसिद्धी मिळेल.

**वृषभ** - मौल्यवान वस्तू व रोकड यांना भलतीकडेच पाय फुटणार नाहीत याची काळजी घ्या. आज आपल्या कामात आपल्याला उत्साह वाटणार आहे. बुद्धिचा उपयोग करून पैसा गुंतवणूक करा.

**मिथून** - खाणेपिणे, पथ्यपाणी व आवडनिवड याबाबतीत कोणतेही टोक गाठू नका. जास्तीचा त्रास होणे शक्य. आपल्या पराक्रमामुळे समाजात व कुटुंबात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे.

**कर्क** - सामाजिक उपक्रमातून प्रसिद्धी मिळेल. धार्मिक कार्यक्रमातून कुटुंबात सुसंवाद साधला जाईल. जबाबदारीचे कामे वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करा.

**सिंह** - नोकरी-व्यवसायात सध्या सावध पावले उचलणे आवश्यक. कोठेही वादाची ठिणगी पडू देऊ नका. महत्वपूर्ण व्यक्तिंचा संपर्क येईल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल.

**कन्या** - महत्त्वाचे निर्णय शक्यतो पुढे ढकला. प्रवास पूर्वनियोजित असेल तरच करा अन्यथा पुढे ढकला. आपल्या कलेचे सादरीकरण करण्याची संधी मिळेल. नवीन वस्तू विकत घेण्याचे योग आहेत.

**तूळ** - सूचक स्वप्नातून काही गोष्टी पुढे येतील. प्रपंच प्रसन्न राहील. आवडीच्या कामात मन रमेल. आपण केलेल्या कामाची सुरुवात चांगली होईल. साहसी वृत्तीत वाढ होण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक** - महिलांना कलाक्षेत्रात वाव मिळेल. सासरकडील मंडळींचा मिळणारा पाठिंबा काही बाबतीत महत्त्वाचा ठरेल. जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी घ्या.

**धनू** - घरातले पिढ्यातले वाद चांगल्या अर्थाने व फायदेशीर असे रंगतील व परिणामदायी होतील. उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. मित्र, सहकारी यांची मदत मिळेल.

**मकर** - महत्त्वाच्या कामात होणारा विलंब गृहीत धरून कामाची आखणी केल्यास अपेक्षित ते हाती लागणे अवघड नाही. मनोधैर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे.

**कुंभ** - हाताखालील नोकरचाकरांवर जास्तीचा विश्वास टाकलेला महागात पडेल. प्रेमप्रकरणात अपेक्षित यश मिळेल. आपल्या कामात बुद्धी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल.

**मीन** - नोकरीच्या ठिकाणी लहान-सहान प्रश्नात अडकू नका. समोरच्याला मोठेपण देऊन वेळ निभावून न्या. आरोग्य चांगले राहील. आर्थिक योग मध्यम आहेत.

## पारावरचा फड

भाषा ही संवादाचे माध्यम असते. अर्थात त्याचा शैक्षणिक समावेश हा सध्या ऐरणीवरचा विषय बनला आहे. त्यात भाषिक त्रिसूत्रीतून पहिलीपासून हिंदीच्या सक्तीबाबत शासन प्रयत्नशील आहे तर त्याला मराठी हृदयसम्राट राज ठाकरे आणि शिवसेना उबाठा सेना प्रमुख उद्धव ठाकरे यांनी कडाडून विरोध केला आहे. वास्तविक उद्धव ठाकरे कट्टर विरोधक असल्याने त्याकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. पण राज ठाकरेंचा विरोध त्यांना परवडणारा नसल्याने त्यांची समजूत काढण्यासाठी प्रयत्न सुरू असले तरी ते अद्याप फोल ठरले आहेत. आता राज ठाकरेंनी त्याविरोधात ६ जुलैला एल्गार पुकारला आहे. त्याला सर्वपक्षीयांनी पाठिंबा द्यावा अशी भूमिका घेतली आहे. अर्थात उद्धव ठाकरेंच्या पक्षाशी वाढती सलगी ही या आंदोलनाच्या निमित्ताने नामी संधी ठरू शकते. त्याबाबत विचारता त्यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांशी चर्चा करू, असे स्पष्ट केले. एकूणच हा भाषिक वाद महायुती अन् राज ठाकरेंशी विसंवाद तर ठाकरे ब्रँड एकीसाठी सुसंवाद ठरण्याची शक्यता आहे. याबाबत पारावरची चर्चा...!

**पांडूनाना :** सरकारचं काय चाललंया कळत न्हाय बग? आता पहिलीपासनं हिंदी भाषेच्या सकतीचं खुळ कशापायी काडलंया कळत न्हाय.

**बाबूराव :** आरं पोरास्नी नवी भाषा शिकायसाटी हे चाललंया. ते फायद्याचंच हाय न्हवं.

**पांडूनाना :** पन मला सांग, ह्या भाषेनं त्याच्या म्होरच्या जीवनात काय फायदा हाय? तसं बी तोडकी-मोडकी का हुईना समदी हिंदी बोलत्यातीच की!

**बाबूराव :** ते बी खराय म्हन. पन आता ह्येनी काडलंया आन् त्या सकतीचं राज आन् उद्धोसायबास्नी लईच झोंबलंया. त्यानी आता इरोद सुरू केलाया.

**पांडूनाना :** उद्धोसायबाचं चाललं आसतं, पन राज सायबाचा इरोद फडनवीस, शिंद्यांची गोची करतुया बग.

**बाबूराव :** त्येंची ताकद काय, काय करनार हायती ते?

**पांडूनाना :** त्येंची ताकद न्हाय रं. आता म्हंबई इलेक्शान म्होरं हाय न्हवं, ते आडचनीचं हाय.

**बाबूराव :** त्येनं काय हुनार हाय?

**पांडूनाना :** आगुदरच उद्धोसायब आन् राज ठाकरेनं एक व्हावं आसं समदीकडनं जोर सुरू हाय. त्ये भाजप आन् शिंद्यास्नी काय सोसनारं न्हाय. म्हनून फडनवीस गुपचूप राज सायबास्नी भेटलं. शिंदेसायबाला बी राज ठाकरे सोबत हावंत म्हनून त्येंची मनधरनी सुरू हाय.

**बाबूराव :** खराय तुजं म्हन, त्यासाटी मंतरी दादा भुशे राजसायबास्नी हिंदीचं समजाय गेलं. पन राज सायबानं सपशेल इरोद करत हाकलून लावंच म्हनाय हावं.

**पांडूनाना :** म्हजी हिंदी सकती म्हायुतीला आडचनीची आन् ठाकरे बरँडसाटी फायद्याची हुतीया म्हन. पन ती म्होरं फळाला येतंय का बगु ! **- अमृत चौगुले**

## उपदेश कथा



### क्रिया-प्रतिक्रिया शाश्वत नियम

एक मुलगा जंगलात गेला होता. चहुकडे निर्जन, उजाड जंगलात हवा व झाडांचाच आवाज येत होता. तो मुलगा घाबरुन ओरडला, 'भूत'. तेव्हा त्याचा आवाज डोंगरांवर आदळून परतला व त्यास ‘भूत’ असे ऐकु आले. मुलाला वाटले की खरंच भूत आहे. तो हाताच्या मुठी आवळत जोराने ओरडला की, ''तू मला खाशील'' डोंगरावर आदळून त्याचा आवाज परतला व त्याला वाटले की भूत मला विचारत आहे. तेव्हा तो म्हणाला,''हो मी तुला खाईल'' हा आवाज त्याच्यापर्यंत आला तेव्हा मुलगा घाबरुन घरी गेला व त्याने आईला सर्व गोष्ट सांगितली. आईने वस्तुस्थिती जाणून घेत सांगितले की, आता जंगलात गेल्यावर तु त्या भूताला सांग की, माझ्या मित्रा मी तुझ्यावर प्रेम करतो. पुन्हा जेव्हा मुलगा जंगलात गेला तेव्हा ओरडला,''माझ्या जीवलग मित्रा'' डोंगरांवर आदळून त्याच शब्दांचा प्रतिध्वनी ऐकू आला आणि भूत आपल्याला घाबरवीत नाही, असे त्याच्या लक्षात आले. नंतर तो म्हणाला,''मी तुझ्यावर प्रेम करतो'' डोंगरावर आदळून हेच शब्द परत आले व मुलाच्या आनंदाला पारावर राहिला नाही. क्रियाची प्रतिक्रिया निसर्गाचा एक शाश्वत नियम आहे.

## दिनविशेष...

### आंतरराष्ट्रीय

१५४२ - हुआन रॉद्रिगेझ काब्रियोने कॅलिफोर्नियावर स्पेनचे आधिपत्य जाहीर केले.

१८०६ - ब्रिटीश सैन्याने अर्जेन्टीनाची राजधानी बोयनोस एर्स जिंकली.

१८४४ - मोर्मोन चर्चच्या संस्थापक जोसेफ स्मिथ ज्युनियरचा कार्थेज, इलिनॉय येथे तुरुंगात खून.

१९५३ - जोसेफ लेनियेल फ्रांसच्या पंतप्रधानपदी.

१९५४ - सोवियत संघात ओब्निन्स्क येथे जगातील पहिले अणुशक्तिवर चालणारे विद्युत उत्पादन केन्द्र सुरू.

१९५७ - अमेरिकेच्या टेक्सास व लुईझियाना राज्यात हरिकेन ऑड्रीचा धुमाकूळ. ५०० ठार.

१९६७ - लंडनजवळ एन्फिल्ड येथे जगातील पहिले ए. टी. एम. सुरू.

१९७६ - सहा पॅलेस्टिनींनी २८० प्रवाशांसह भरलेले विमान पळवून युगांडातील ऐटेंब येथे नेले आणि इस्त्राईलच्या तुरुंगातील २२ पॅलेस्टिनी गनिमांच्या सुटकेची मागणी केली.

१९७७ - जिबुटीला फ्रांसपासून स्वातंत्र्य.

१९८० - एरोलिनी इटाव्हिया फ्लाईट ८७० हे डी. सी. ८ प्रकारचे विमान इटलीत युस्टीका शहराजवळ कोसळले. ८१ ठार.

## जन की बात...

### मंत्र्याचे स्वागत अन् विद्यार्थ्यांची मदत...

बळी तो कानपिळी हा न्याय सर्वत्र प्रचलित आहे. तसेच तळे राखणार तो पाणी पिणार ही म्हणदेखील तितकीच प्रसिद्ध आहे. दाखला इतक्याचकरिता राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या स्वागतासाठी संबंधित शाळेतील विद्यार्थ्यांना कामाला जुंपल्याचे वृत्त प्रसारमाध्यमातून प्रसिद्ध झाले. यावर बरेच खल झाले असले तरी हा न्याय काही वेगळा म्हणता येणार नाही. भारतासारख्या लोकशाहीप्रधान देशात रोजच कुठेना कुठे निवडणुका होत असतात. यानिवडणुकीतल इच्छुक हे कोणत्या ना कोणत्या संस्थेचे प्रमुख असतात, अशावेळी त्यांच्या प्रचारार्थ त्यांच्या संस्थेतील कर्मचारी ऑन ड्युटीच्या नावावर इतर कामे करत असतात. किंवा अशा कर्मचार्यांना अन्य कामाला संबंधित नेता जुंपत असतो. दादा भुसे यांच्या स्वागताला विद्यार्थ्यांना कामाला लावणे काय किंवा शिक्षकांना देखील अशैक्षणिक कामे लावणे काय हे दोन्ही प्रकार तसेच खेदजनक आहेत. आता स्थानिक स्वराज्य संस्थांचे बिगुल वाजले आहे. त्यामुळे सर्वच जिल्ह्यात यापेक्षा काही वेगळी स्थिती पाहावयास मिळणार नाही. मात्र अशा नेत्यांनी खरोखरच बळी तो कानपीळी या न्यायाने आपल्या राजकीय पदाचा गैरवापर करून संबंधित कर्मचार्यांना अशा कामांना जुंपू नये.

**- अमित सावंत, सांगली**

### शक्तिपीठ एक ना धड...

राज्य सरकारचे सध्याचे धोरण हे एक ना धड भाराभार



चिंध्या या म्हणीसारखे होऊन बसले आहे. बहुप्रतिक्षित असा हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे नागपूर ते मुंबई समृद्धी महामार्ग सरकारने बनविला खरा, मात्र अजून तो पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाला नसताना आता पुन्हा त्यांनी शक्तिपीठ या महामार्गाचा घाट घातला आहे. वास्तविक राज्याची आर्थिक स्थिती अत्यंत चिंताजनक आहे. त्यातच लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांना द्यायला सरकारकडे पैसे नाहीत. त्यामुळे अन्य विभागांचा निधी वळविला जात आहे. राज्याचे कर्ज दिवसेंदिवस वाढत चालले आहे. तर समृद्धी मार्गासाठी झालेला खर्च अजूनही निघालेला नाही. अशावेळी पर्यायी मार्ग असताना प्रवाशांची मागणी नसताना केवळ विकास या गोंडस नावाखाली जर आपली प्रकृती अत्यंत चिंताजनक असताना सरकारने शक्तिपीठ सारखे ओझे उचलण्याचे धाडस का करावे, हे कोडे न उलघडण्यासारखे आहे. रस्त्याशिवाय विकास नाही हे जरी खरे असले तरी शक्तिपीठला विरोध करण्याचेही कारण नाही, मात्र आज रोजी तिजोरीत खडखडाट असताना असे आसुरी धाडस कशासाठी. मार्ग बनवा विकास करा मात्र तो आपल्या कुवतीनुसार बनवा, अगोदरच्या रस्त्यातील गुंतवणूक निघालेली नसताना आता नवी गुंतवणूक म्हणजे आपल्याच पायावर दगड मारून घेण्याचा प्रकार आहे. त्यामुळे समृद्धीतून समृद्धी यावी शक्तिपीठातून राज्याची शक्ती वाढावी मात्र त्याकरिता आपली स्थिती सुद्धा मजबूत असावी. राज्यावर कर्जाचा बोजा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. त्यायोगे पैशाचे अनुमान समजून घेऊन असे प्रकल्प राबवावेत कारण याचा होणारा भुर्दंड देखील राज्यातील नागरिकांनाच सहन करावा लागणार आहे.

**ज्ञानेश्वर मोरे, पुणे**

### पावसातून मार्गक्रमण जपणूच..

यंदा मान्सून सुरू होण्यापूर्वीच राज्यात पावसाने दमदार हजेरी लावली आहे. मात्र पाऊस जसा जसा वाढत चालला आहे तसतसे नद्यांना पूर येऊन नदी पार करताना किंवा पर्यटनाला गेलेल्या नागरिकांच्या बुडून मृत्यू झाल्याच्या घटनांतदेखील वाढ होताना दिसते आहे. नुकतेच पुण्यातील भुशी डॅम येथे वर्षा विहारासाठी गेलेल्या तरुणा नदीच्या जोरदार प्रवाहातून वाहत जात असताना त्याच्याच मित्रांनी वाचविले तर दुसरीकडे बीडसारख्या जिल्ह्यात ऐन पावसाळ्यात नदीपुलावर पाणी आले असतानादेखील त्यातून दुचाकीसह प्रवास करत असताना दुचाकीस्वार वाहून गेला आहे. पाण्याचा ज्यावेळी जोर वाढतो त्यावेळी त्याचा अंदाज येत नसेल तर असे अवसानघातकी धाडस प्रवाशांनी करता कामा नये. मात्र दुर्देव असे की असे धाडस सर्रास करताना नागरिक दिसत आहेत. सांगली जिल्ह्यातदेखील असाच प्रकार कवठेमहांकाळ तालुक्यात घडला होता. अग्रणीला पूर आला असताना त्यातून प्रवास करत असताना एक बसमध्ये फसली होती. त्यावेळी प्रशासनाला प्रवाशांना वाचवित असताना त्यांची तारांबळ उडाली होती. त्याचप्रमाणे जनावरेसुद्धा अशा पुराच्या पाण्यातून जाताना वाहून गेल्याच्या घटना घडल्या आहेत. एक शेतकरी बैलागाडीतून पाण्यातून येताना बैले वाहून गेली आहेत. त्यामुळे पाण्यातून वाहतूक करताना अतिरेकी उत्साह किंवा धाडस टाळणे गरजेचे आहे.

**- प्रशांत कांबळे, मिरज**

# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे लोककल्याणाचे कार्य महान : बी.आर.खाडे



■ जनप्रवास प्रतिनिधी

ओतूर : महाराष्ट्रात अनेक महान समाज सुधारक होऊन गेले. पण राजर्षी छत्रपती शाहू महाराज एक राजा म्हणून महान समाज सुधारक होते.शाहू महाराज हे प्रजेचे पालक व खऱ्या अर्थाने राजे होते.शाहू महाराजांचे लोककल्याणाचे कार्य महान असल्याचे प्रतिपादन चैतन्य विद्यालयातील इंग्रजी विभागाचे प्रमुख बी.आर.खाडे यांनी केले.

ग्राम विकास मंडळ ओतूर (ता. जुन्नर) येथील चैतन्य विद्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमावेळी श्री खाडे हे बोलत होते. यावेळी संस्थेचे सचिव प्रदीप गाढवे, सहसचिव पंकज घोलप,उपमुख्याध्यापक संजय हिरे, पर्यवेक्षक अनिल उकिरडे, संतोष सोनवणे, विजया गडगे,भगवंत घोडे,राजाराम शिंदे, एम. एम.तांबे,अजित डांगे,देवचंद नेहे, अमित झरेकर, बाळासाहेब साबळे,संतोष कांबळे, विशाल चौधरी, मिलिंद खेत्री, आसावरी गायकर, लक्ष्मण दुडे, वनिता भोर, अश्रशा गिते, सोनाली माळवे, शिल्पा भालेराव, सोनाली कांबळे, अनिल जवरे, दिनेश ताठे,आशा डुंबरे,अश्विनी नलावडे, तनुजा थोरात,निर्मला डोंगरे,हर्षल शितोळे,अनुराधा इसकांडे, विजय खरात, मयूर जाधव, साक्षी देशमुख, योगेश फापाळे, ईश्वर ढमाले, तेजस ढमाले,दीपक हांडे,आदि मान्यवर उपस्थित होते.

खाडे पुढे म्हणाले की,शाहू महाराजांनी आंतरजातीय विवाहास त्यांनी कायदेशीर मान्यता दिली. प्राथमिक शिक्षणाचा सक्तीचा कायदा केला. कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधले. बालविवाह प्रतिबंध केला. पुनर्विवाह मान्यता दिली. स्त्री संरक्षण कायदा प्रथम लागू केला. शाहू मिल, राधानगरी असे मोठे प्रोजेक्ट त्यांनी उभारले. कोल्हापूरला गुळाची बाजारपेठ म्हणून मान्यता मिळण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. शेती आणि उद्योग व्यवसायाला त्यांनी प्राधान्य दिले. म्हणूनच त्यांना राजर्षी ही पदवी बहाल करण्यात आली.''

# 'हिंदी भाषेची सक्ती बिनडोक व कर्मदरिद्री'

## ज्येष्ठ साहित्यिक व मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपाल सबनीस यांचा घणाघात

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : महाराष्ट्र राज्य शासनाचा हिंदी वा तिसऱ्या भाषेची सक्ती करण्याचा निर्णय कर्मदरिद्री, बिनडोक आणि महाराष्ट्राचा घात करणारा असल्याचे परखड प्रतिपादन साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपाल सबनीस यांनी केले.



बालगंधर्व परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'हिंदीची सक्ती कशाला?' या विषयावर आयोजित केलेल्या प्रकट संवादामध्ये साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपाल सबनीस साहित्य आणि संमेलनाचे माजी अध्यक्ष व भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्याशी सौमित्र पोटे यांनी संवाद साधला. या संवादामध्ये महाराष्ट्रावर केल्या जाणाऱ्या हिंदी शिक्षणाच्या सक्तीबद्दल परखड चर्चा करण्यात आली.

यापूर्वीच्या शिक्षण धोरणात देखील इयत्ता पाचवी पासून हिंदी शिकवली जात होती. आता ती पहिलीपासून सक्तीची करण्याच्या निर्णयामुळे सक्ती केल्यामुळे मराठी भाषिकांमधील हिंदीविषयीचे प्रेमच नष्ट होण्याची भीती देशमुख यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली. महाराष्ट्र सरकारने नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना केंद्राच्या धोरणाची योग्य 'कॉपी' राज्य शासनाला करताना आल्याचे निदर्शनास आणून दिले. सध्या महाराष्ट्रात ७० टक्के मराठी भाषिक राहिले असून ३० टक्के अन्य भाषिक असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. त्यामुळे आगामी काळात केंद्र सरकारची सक्ती कायम राहिल्यास महाराष्ट्रातील मराठी जनतेत देखील हिंदीचा प्रभाव वाढवून मराठी धोक्यात येण्याची भीती त्यांनी व्यक्त केली.

केंद्र शासनाचा निर्णय माथी घेऊन हिंदी सक्तीचे धोरण स्वीकारणे अतिशय गलथान आहे. केंद्राची गुलामी पत्करून मराठीचा गळा दाबण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोप श्रीपाल सबनीस यांनी केला आ

हिंदी ही राष्ट्रभाषा नाही. वास्तविक मराठी आणि तमिळ या भारतातील दोन भाषा २२०० वर्ष जुने आहेत. मराठीची गुणवत्ता हिंदीपेक्षा काही पटीने अधिक आहे. त्यामुळे ती लादणे हा मराठीचा आणि महाराष्ट्राचा अपमान आहे, अशी भावना या मान्यवरांनी व्यक्त केली.

# जुन्नरच्या सर्वांगीण विकासात माजी आमदार स्वर्गीय वल्लभ बेनके यांचे भरीव योगदान : शरद लेंडे

■ जनप्रवास प्रतिनिधी

नारायणगाव : प्रशासनावर पकड असलेला,शिस्तप्रिय आमदार व कार्यकर्त्यांना घडविणारा, त्यांना राजकीय ताकद देणारा नेता म्हणून माजी आमदार वल्लभ बेनके यांची जनसामान्यांमध्ये ओळख आहे. शिक्षण,सहकार,जलसिंचन, शिवनेर परिसर विकास आदि क्षेत्रात उल्लेखनीय काम करून जुन्नर तालुक्याचा सर्वांगीण विकासात माजी आमदार स्वर्गीय वल्लभ बेनके यांचे भरीव योगदान आहे. असे मत जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शरद लेंडे यांनी व्यक्त केले.

माजी आमदार वल्लभ बेनके यांच्या ७६ व्या जयंती निमित्त जुन्नर तालुका औद्योगिक सहकारी वसाहत कांदळी येथे नुकतेच विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट या दोन्ही पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते माजी आमदार वल्लभ बेनके यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी संस्थेच्या आवारामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. माजी आमदार अतुल बेनके, कांदळी वसाहतीचे अध्यक्ष अमित बेनके, गौरी बेनके, धनश्री बेनके यांच्या हस्ते मे. दाते पॉलिमर इंडस्ट्रीज प्रा.लि च्या चेअरमन मंगल सचिन दाते यांना उत्कृष्ट उद्योजक, जावेद अस्लम शेख, विद्या





संदिप ढवळे यांना गुणवंत कामगार पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. औद्योगिक वसाहती मधील कामगारांना भेटवस्तुचे वाटप करण्यात आले.या वेळी ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष अनिल मेहेर, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष देवराम लांडे, माजी उपाध्यक्ष पांडुरंग पवार, गणपत फुलवडे, गुलाबराव नेहरकर, भाऊ देवाडे,रघुनाथ लेंडे,बाळासाहेब खिलारी,बाजीराव ढोले, सुप्रिया लेंडे, उज्वला शेवाळे, विजय कुऱ्हाडे, अंकुश आमले, मोहित ढमाले, माऊली कुऱ्हाडे, तुषार थोरात, बाबा परदेशी, काळू शेळकंदे, मारुती वायाळ, फिरोजभाई पठाण, तानाजी बेनके आदी मान्यवर उपस्थित होते.

अनिल मेहेर म्हणाले वल्लभशेठ बेनके यांनी तालुक्याच्या विकासाला गती देण्याचे काम केले. धरणांचे कालवे, कोल्हापूर बंधारे, पतसंस्थांची स्थापना, आदिवासी भागात आरोग्य व शिक्षणाची सुविधा, चिल्हेवाडी बंद पाईपलाईन कामास मंजुरी आदि कामे त्यांनी प्राधान्याने केली. वैयक्तिक संघर्षाचे राजकारण त्यांनी केले नाही. हाच आदर्श समोर ठेवून माजी आमदार अतुल बेनके व बेनके कुटुंबीय सामाजिक कामात कार्यरत आहेत.

पक्ष नेतृत्वाशी संघर्ष करून माझ्यासारख्या आदिवासी कार्यकर्त्याला त्यांनी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष केले.त्यांचे उपकार मी कधीच विसरू शकत नाही.वल्लभ बेनके यांच्यासारखे नेतृत्व पुन्हा होणे नाही. अशा भावना जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष देवराम लांडे यांनी व्यक्त केल्या . यावेळी तानाजी बेनके, अनिल तांबे, फिरोज पठाण,काळू शेळकंदे,गणपत फुलवडे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन औद्योगिक वसाहतीचे मुख्य व्यवस्थापक तुषार पडवळ यांनी केले. आभार पांडुरंग पवार यांनी मानले.

# डॉ. देवरे यांना 'योगरत्न' पुरस्कार

■ जनप्रवास वार्ताहार

पंणतांबा : येथील आशा केंद्राचे निवासी वैद्यकीय अधिकारी व योग प्रशिक्षक डॉ गणेश राघो देवरे यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी डॉक्टर सेंल च्या वतीने योग रत्न पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला

आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, ए जी एम ए, व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) डॉ सेल आयुष विभाग वतीने प्रतिष्ठेचा योगरत्न पुरस्कार यशवंतराव चव्हाण नाट्यगृह छत्रपती संभाजीनगर येथे प्रदान करण्यात आला या पुरस्काराला महाराष्ट्रातील योगशिक्षक योग थेरपीस्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षण सम्राट राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी



डॉक्टर सेलचे प्रदेश अध्यक्ष डॉ श्री बाळासाहेब पवार कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. यावेळी उद्योजक मनोज दांडगे डॉ नितीन राजे पाटील आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन व्हाईस चेअरमन तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी डॉक्टर सेल प्रदेश कार्याध्यक्ष (आयुष विभाग) डॉ सतीश कराळे चेअरमन आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, डॉ बाबुराव कानडे अध्यक्ष आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, दिशा चव्हाण, व इतर आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते

# शरदचंद्र पवार फार्मसी महाविद्यालयाचा निकाल शंभर टक्के

■ जनप्रवास प्रतिनिधी

ओतूर : महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई, बोर्डाचा डिप्लोमा फार्मसी या शाखेचा नुकताच निकाल जाहीर झाला असून श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे शरदचंद्र पवार इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला असून,महाविद्यालयाने महाराष्ट्र राज्यामध्ये अव्वल स्थान प्राप्त केले आहे. सर्वच विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम घेऊन एम.एस.बी.टी.ई डिप्लोमा फार्मसी उन्हाळी परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले असून प्रथम वर्ष डिप्लोमा फार्मसी मध्ये प्रथम क्रमांक श्वेता मिरावली पवार ८२.४० टक्के,द्वितीय नमरा हुसेन खान पठाण ७८.७० टक्के,तृतीय दिशा चांद शेख ७५.४० टक्के

द्वितीय वर्ष डिप्लोमा फार्मसी मध्ये सानिका छगन कोडलकर ही विद्यार्थिनी ८७.४ टक्के गुण मिळवून प्रथम आली असून इन्तखाब एकरमुद्दीन अन्सारी ८३.४६ टक्के, मुस्कान अजित चौगुले ८०.४६ टक्के गुण मिळवून द्वितीय व तृतीय स्थानांकन प्राप्त केले आहे अशी माहिती शरदचंद्र पवार फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश दामा यांनी दिली.

संस्थेचे अध्यक्ष विशाल तांबे व संस्थेचे मानद सचिव वैभव तांबे व प्राचार्य डॉ.गणेश दामा यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून, पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# श्री नागेश्वर व्यापारी संघातर्फे वारकऱ्यांसाठी फळ वाटप

■ जनप्रवास प्रतिनिधी

पाटस : जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराजांच्या देहू ते पंढरपूर पालखी सोहळ्याचे पाटस मध्ये व्यापारी व ग्रामस्थांच्या वतीने मोठया उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी श्री नागेश्वर व्यापारी संघामार्फत वारकऱ्यांसाठी फळ वाटप करण्यात आले.

सकाळी साडे आठ वाजता तुकोबारायांच्या पालखीचे श्री नागेश्वरांची पुण्यभूमी कसबे पाटस येथे आगमन झाले. या वैष्णवांच्या मेळ्यात एक पुण्यकर्म म्हणून श्री नागेश्वर व्यापारी संघ व कसबे पाटस ग्रामस्थांच्या माध्यमातून वारकरी बांधवांना सुमारे एक हजार किलो केळीचे वाटप करण्यात आले. सकाळच्या




प्रहरी न्याहारी म्हणून वारकरी बंधू भगिनींनी फलाहाराचा आनंद घेतला. नुकत्याच स्थापन झालेल्या श्री नागेश्वर व्यापारी संघाच्या माध्यमातून हे 'फळे वाटप' अभियान राबविण्यात आले.

या फळे वाटप प्रसंगी मिथुन शितोळे, हर्षद बंदीष्टी, विठ्ठल वाळुंजकर, शैलेंद्र पंडित, गणेश सुळ, अमित पवार, संतोष खरात, अजिंक्य कुदांडे, सुनिल शिवतारे, विठ्ठल आव्हाड, महेश भागवत, शरद शितोळे, सचिन शितोळे, सोमनाथ बिनवडे, सोमनाथ ढमाले, पांडुरंग बनकर, प्रमोद ढमाले, तानाजी केकाण, संतोष वरघडे, प्रशांत शितोळे, अनिरुद्ध पानसरे, अभिजित भागवत, गणेश शितोळे तसेच श्री नागेश्वर व्यापारी संघाचे पदाधिकारी, सदस्य, व्यापारी बंधू व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्येष्ठ नागरिक विठोबा वहाडणे यांचा सत्कार



■ जनप्रवास वार्ताहार

पुणतांबा : पन्नास वर्षांपूर्वी सन १९७५ ते ७७ च्या आणीबाणीच्या काळात त्यावेळच्या जनसंघाच्या पदाधिकाऱ्यांना तुरुंगात टाकण्यात आले होते या घटनेस २५ जुन ला ५० वर्ष पूर्ण झाले याबद्दल , महाराष्ट्र सरकारच्या वतीने येथील सत्याग्रहींना सन्मानपत्र घेऊन गौरव करण्यात आला. आणीबाणीच्या काळात मिसाबंदीची अहिल्यानगर जिल्ह्यात ३७ जण तुरुंगात होते त्यामध्ये पुणतांबा येथील सहा तर चांगदेव नगर येथील एका जनसंघाच्या पदाधिकाऱ्यांचा समावेश होता , ज्येष्ठ नागरिक जनार्दन विठोबा वहाडणे यांनी आणीबाणीच्या काळात १९ महिने तुरुंगवास भोगला आहे त्यांचा आज कोपरगावच्या माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांच्यावतीने तालुकाध्यक्ष विशाल गोरडे व सुनील कदम यांनी सन्मानपत्र देऊन सत्कार केला यावेळी सोसायटी नंबर २ चे अध्यक्ष सुधाकर जाधव संभाजी गमे रामपूर वाडीचे सरपंच संदीप सुरडकर चंद्रकांत वाटेकर भारत वहाडणे जगदीश वहाडणे आदी उपस्थित होते बुधवारी अहिल्यानगर येथे जिल्हाधिकारी यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

# पाटस येथील गायकवाड कुटुंबियांनी केला आषाढी वारीतील वारकऱ्यांचा पाहुणचार

## वारकऱ्यांची सेवा करून साक्षात माऊलींची सेवा केल्याची भावना केली व्यक्त

■ जनप्रवास प्रतिनिधी

पाटस : येथील गायकवाड कुटुंबाने प्रथमच आषाढी वारीनिमित्त आलेल्या वारकऱ्यांचा पाहुणचार मोठ्या भक्तीभावाने केला. यावेळी इथून पुढे दरवर्षी वारकऱ्यांसाठी खानपानाची सोय करण्याचा निर्धार गायकवाड कुटुंबियांनी केला आहे.

आषाढी वारीनिमित्त जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांची पालखी वरवंड येथे मुक्कामी असते. पालखी सोबत आलेल्या दिंड्या देखील मुक्कामी थांबत असतात. दिंडीमधील वारकऱ्यांची खाण्यापिण्याची गैरसोय होऊ नये म्हणून स्थानिक ग्रामस्थ सेवा समजून त्यांचे आदरातिथ्य करत



असतात. त्यांच्या झोपण्याची व्यवस्था नसल्यास तीही करतात.

याच उदात्त भावनेतून पाटस येथील गायकवाड कुटुंबाने वरवंड येथे मुक्कामाची जागा न मिळाल्याने पाटस येथे आलेल्या दिंडीचा यथोचित पाहुणचार केला. ऐनवेळी वारकऱ्यांच्या रूपाने पाहूणे मंडळी दारी येऊन सुद्धा गायकवाड परिवाराने त्यांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ न देता आनंदाने आणि भक्तीभावाने सेवा केली. रात्रीचे जेवण आणि सकाळच्या चहा नाष्ट्याची सोय त्यांनी केली होती.

जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या पालखीच्या पाठीमागे असणाऱ्या १७० क्रमांकाच्या सदर दिंडीचे १९ वे वर्ष असून ती दरवर्षी देहू ते पंढरपूर मार्गक्रमण करत असते. साधारण ११० वारकरी संख्या असलेल्या या दिंडीमार्फत सदस्यांकरीता वाहनाची तसेच संपूर्ण पालखी काळात खाण्यापिण्याची, मुक्कामाची व सुरक्षिततेची हमी घेतली जाते तसेच त्यांना सर्वतोपरी मदत पुरविली जाते. मुक्कामाच्या ठिकाणी भजन कीर्तन करत हरीनामाचा जप करत दिंडी माऊलीच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे आगेकुच करत असते. या दिंडीत सर्व वयोगटाचे वारकरी सहभागी असतात. खासकरून वारकरी शिक्षण संस्था, आळंदी येथील लहान विद्यार्थी देखील सामील असतात. यातील काही बालकीर्तनकार मृदंग वाजविण्यात तरबेज आहेत.

दिंडी चालक नामदेव आगे यांच्या दिंडीकरीता एसजी ग्रुपचे विक्रांत गायकवाड, हरिओम कन्स्ट्रक्शनचे नवनाथ गायकवाड, रुपाली गायकवाड, कृष्णाजी गायकवाड, छगुबाई गायकवाड, नवनाथ जांबले आणि कुटुंबीय तसेच पांडुरंग फडके आणि कुटुंबीय यांनी केलेल्या सेवेसाठी आगे यांनी त्यांचे मनःपूर्वक धन्यवाद मानले आहेत.

# दरोडा टाकण्याचे तयारीत असलेली परराज्यातील टोळी गजाआड

## कोतवाली पोलिसांनी केली धडाकेबाज कामगिरी



■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : नगर शहरातील माळीवाडा परिसरात दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या आरोपींना कोतवाली पोलिसांनी अटक केली. दि. २५जुन रोजी मध्यरात्री ०३.०० वा. चे सुमारास रात्रगस्त पेट्रोलिंग अधिकारी म.पो. उप.निरी. शितल मुगडे यांना रात्रगस्त दरम्यान गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, माळीवाडा वेशी जवळ, अहिल्यानगर येथे अंगात काळे रंगाचे कपडे घातलेले एकुन ५ संशयीत इसम हे कोठतरी चोरी करण्याचे उद्देशाने रात्रीचे अंधाराचा फायदा घेवून एकत्रीत थांबलेले आहे.

त्याबाबत त्यांनी तात्काळ मा. पोलीस निरीक्षक श्री. प्रताप दराडे यांना माहीती देवून त्यांचे सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे पोलीस स्टाफ व पंचासह बातमीतील नमुद ठिकाणी जावुन मध्यरात्री ०३.२५ वा. कारवाई केली. सदर ठिकाणी ५ इसम हे त्यांचे ताब्यात दरोड्याकरिता लागणारे साहित्य साधनांसह मिळुन आले त्यातील तीन इसमांना जागीच पकण्यात आले परंतु २ इसम रात्रीचे अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेले.

म.पो.उप.निरी. शितल मुगडे पकडलेल्या तिघा इसमांना त्यांचे नाव पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नावे १) गोलुसिंग नसिबसिंग पटवा उर्फ सिकलीगर, वय २२ वर्षे, रा. पाचोली, ता. खकनार, जिल्हा बुरानपुर, मध्यप्रदेश राज्य २) पातालसिंग दिलीपसिंग सिकलीगर, वय २० वर्षे, रा. एकता नगर, नलवा रोड, नंदुरबार, महाराष्ट्र राज्य, ३) आकाशसिंग कैलाससिंग सिकलीगर, वय १९ वर्षे, रा. बीआरसी गेट, उदना प्रभु नगर, सुरत, गुजरात राज्य असे असल्याचे सांगितले. त्यांच्याकडून लोखंडी साहित्य जप्त करण्यात आले गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठांचे सुचना व मार्गदर्शनाखाली पो.उप. निरी. गणेश बाळासाहेब देशमुख, कोतवाली पो. स्टे. हे करित आहेत.

## कोथुळच्या उपसरपंच पदी शीतल धस यांची बिनविरोध निवड



■ जनप्रवास प्रतिनिधी

श्रीगोंदा : कोथुळ ता. श्रीगोंदा येथील ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी शीतल नवनाथ धस यांची एकमताने बिनविरोध निवड झाली. निवड प्रक्रियेच्या अध्यक्षस्थानी सरपंच अंजली दिवटे हे होत्या.

दिनांक २५ जून २०२५ रोजी कोथुळ येथील ग्रामपंचायत मधील उपसरपंच निवडीचा कार्यक्रम पार पडला. सरपंच अंजली दिवटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवडणुकीमध्ये शितल नवनाथ धस यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची एकमताने बिनविरोध निवड झाली. यामध्ये सहा ग्रामपंचायत सदस्यांनी शितल धस यांना मतदान केले. विरोधी पक्षाचे तीन सदस्य गैरहजर होते. त्यामुळे शितल धस यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग सोयीस्कर झाला. शितल धस यांच्या निवडीमुळे कोथुळ मधील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

तसेच त्यांच्या निवडीचे सरपंच अंजली रामकृष्ण दिवटे माजी सरपंच शिल्पा लाटे, महेंद्र लाटे, माजी उपसरपंच अमीर सय्यद ,ग्रामपंचायत सदस्य सविता धस, सुरेश शिंदे, गोटू दिवटे, गणेश लाटे, संतोष भास्कर लाटे, किसन बाळासाहेब लाटे, भागवत दिवटे, हरिश्चंद्र लाटे ,बाळासाहेब धस तसेच राष्ट्रीय चर्मकार महासंघ, अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब केदारे व कार्याध्यक्ष महेशकुमार शिंदे यांनी यांचे अभिनंदन केले.

## मध्यमेश्वर भगवान पायी पालखी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान



■ जनप्रवास प्रतिनिधी

नेवासा : ‘‘हरि आणि हर‘‘यांचे ऐक्य सांगणाऱ्या तीर्थक्षेत्र नेवासा येथील प्रवरानदीच्या तीरावर असलेल्या मध्यमेश्वर मंदिरातील मध्यमेश्वर भगवान पायी पालखी दिंडीचे गुरूवारी दि.२६ जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान झाले. दहा दिवसामध्ये पंढरपूरमध्ये पोहचणारी एकमेव दिंडी म्हणून या दिंडीची ओळख आहे.

ब्रम्हलीन योगी मनोहरनाथ बाबा यांच्या कृपा आशिर्वादाने व वैकुंठवाशी हभप नासिकेत महाराज कोरेकर,कै.पंढरीनाथ हारदे गुरुजी यांच्या प्रेरणेने व बालयोगी महंत श्री ऋषीनाथजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेल्या व दहा दिवसात पंढरपूरात पोहचणाऱ्या या दिंडीचे हे ३९ वे वर्ष आहे. दिंडीच्या प्रस्थानाच्या पूर्वी महंत बालयोगी श्री ऋषिनाथजी महाराज यांच्या हस्ते श्री मध्यमेश्वर शिवलिंगास वेदमंत्राच्या जयघोषात अभिषेक घालण्यात आला. त्यानंतर ब्रम्हलिन योगी श्री मनोहरनाथ बाबांच्या मूर्तीस पुष्पहार घालून त्यांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले.यावेळी दिंडी चालक हरि भक्त परायण विजय महाराज पवार,हभप गोपीनाथ महाराज कोरेकर,दिनकर महाराज हारदे,सुखदेव महाराज नांगरे,शशिकांत महाराज कोरेकर,सुभाष दळवी, बबनराव वाखुरे,सीताराम कोकणे, राजूभाऊ तनपूरे,रामकिसन पटारे,कचरू मिस्तरी,डॉ. मुकुंद हारदे यांच्यासह शेकडो भाविक दिंडीत सहभागी झाले होते.

## संत चरित्र वाचनाने वाचा शुद्ध होते : रामानंद गिरीजी महाराज



■ जनप्रवास प्रतिनिधी

राहाता : श्री साई चरित्र अथवा कोणत्याही संतांचे चरित्राचे पारायण हे एक तप आहे. संत चरित्र वाचनाने वाचा शुद्ध होते. अहंकार होऊ देऊ नका, अहंकार घातक आहे. असत्य व अप्रिय बोलू नका. कोणाची निंदा करू नका, खरं वागा, असा उपदेश मुक्ताई ज्ञानपीठ (पुणतांबा )येथील महंत श्री रामानंद गिरीजी महाराज यांनी दिला.

राहता येथील श्री साई स्नेहबंध ग्रुप च्या वतीने श्री दत्त साई मंदिरामध्ये सात दिवसीय श्री साई सच्चरित्र ग्रंथ पारायण सोहळ्याचे सांगता निमित्त आयोजित प्रवचनामध्ये ते बोलत होते या पारायण सोहळ्यात५५ साई भक्तांनी सहभाग घेतला. या पारायण सोहळ्याचे व्यासपीठ चालक विठ्ठलराव कातोरे( निमगाव ) व महेश बाविस्कर(शिर्डी )हे होते. सांगता निमित्ताने शहरातून साई चरित्र ग्रंथाची रथामध्ये सहभाद्य मिरवणूक काढण्यात आली.त्यानंतर प्रवचन व महाप्रसाद भोजन कार्यक्रम संपन्न झाला ०यावेळी महंत रामगिरीजी महाराज म्हणाले की संत चरित्र वाचन करीत रहा. यामुळे वाणी पवित्र होते परंतु भगवंताची व संतांची उपासना करताना आपला प्रपंच व आपलं काम सोडून देऊ नका. उपासना व नामस्मरण करीत रहा. श्री साई चरित्र ग्रंथातील रोज किमान पाच ओव्या वाचा, त्यामुळे तुमचे तप सुरू राहुन वाणी रोज शुद्ध राहील. अहमदाबाद येथील विमान दुर्घटनेतील मृत्यू पावलेल्या तसेच अतिरेक्यांच्या हल्ल्यात निधन पावलेल्या भारतीय नागरिक व सैन्य दलातील जवानांना तसेच श्री साई स्नेह बंध गृप चे जेष्ठ सदस्य कै नारायणराव बोठे पा यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.श्री साई स्नेहबंध ग्रुप चे सदस्य शंकरराव बाबर, बाळासाहेब सोनटक्के, अँड दीपक गांधी, दत्तात्रय कुलकर्णी, रामकृष्ण लोंढे, अनिल जोशी, ज्ञानेश्वर सोमवंशी, अनंत लावर गुरु, बाळासाहेब कारले, अरविंद निसळ, पांडुरंग भातोडे, सुभाष सदाफळ, बबनराव लुटे, हरीभाई केयाल (मुंबई)चंद्रभान, मेहत्रे, दत्ता वैद्य, दीपक सापिके, साहेबराव कुदळे, माऊली गाडेकर, राजू महाराज, निवृत्ती बनकर, निवृत्ती धुमसे, अँड मनिष खिस्ते आदींनी परिश्रम घेतले

## रविवारी टाकळी ढोकेश्वरला शेतकरी मेळाव्याचे आयोजन

### हवामान तज्ञ पंजाबराव डख करणार शेतकऱ्यांना मार्गदर्शन



■ जनप्रवास प्रतिनिधी

पारनेर : आदर्श शिक्षक, भूजल अभ्यासक आणि शेतकऱ्यांचे मार्गदर्शक स्वर्गीय सुखदेव साळवे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त येत्या रविवारी, दि. २९ जून २०२५ रोजी सकाळी १० वाजता टाकळी ढोकेश्वर येथे भव्य शेतकरी मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला राज्यातील प्रसिद्ध हवामान तज्ञ पंजाबराव डख उपस्थित राहून शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत.स्व. सुखदेव साळवे यांनी आपल्या भूजल संशोधन आणि शेतीविषयक मार्गदर्शनाने संपूर्ण महाराष्ट्रात विशेष ओळख निर्माण केली होती. त्यांच्या कार्याला उजाळा देण्यासाठी आणि शेतकऱ्यांना प्रेरणा मिळावी यासाठी हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा टाकळी ढोकेश्वर येथील भीमप्पा लॉन्स् येथे होणार असून, यात शेतकऱ्यांना आपले प्रश्न थेट तज्ञांसमोर मांडण्याची संधी मिळेल. पंचायत समिती सदस्य अमोल साळवे, मित्रपरिवार आणि देवकृपा प्रतिष्ठान यांच्या वतीने सर्व शेतकरी बांधव, नागरिक आणि हितचिंतकांना या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## एमआयडीसीमुळे सोनेवाडी परिसराचा विकास होणार : स्नेहलता कोल्हे



■ जनप्रवास वार्ताहार

पुणतांबा : एमआयडीसी मुळे सोनेवाडी परिसराचा विकास होणारा असून त्या दष्टीने शासन स्तरावर प्रयत्न सफल होत असल्याचा आनंद आहे असे प्रतिपादन माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी केले

सोनेवाडी परिसरातील २३६ एकर जमीन एमआयडीसीसाठी अधिग्रहित करण्यात आली आहे. त्यापैकी १८१ एकर जमिनीवर कंपनीची उभारणी सुरू आहे. हे सर्व करत असताना नकाशातील रस्ता नामशेष झाला होता. शेतकऱ्यांची मोठी दळणवळणाची समस्या निर्माण झाली होती. ही बाब अत्यंत गंभीर असल्याने महाराष्ट्र औद्योगिक वसाहत महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी डॉ. गणेश राठोड यांच्या लक्षात आणून दिली. त्यांनी तात्काळ या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन शेतकऱ्यांना रस्ता उपलब्ध करून दिला.सोनेवाडी परिसरातील अनेक समस्या आहेत त्या सर्व समस्या सोडवण्यासाठी कोल्हे परिवार

युवानेते विवेक कोल्हे यांनी संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या माध्यमांतून एमआयडीसी होण्यासाठी हजारो स्वाक्षरी मोहीम राबवत सौ कोल्हे यांच्या समवेत सरकारकडे केलेल्या प्रयत्नांचा लढा हा महत्वाचा ठरला असून प्रगतीच्या वाटा खुल्या होण्यासाठी कोल्हे यांचे प्रयत्नांना यावेळी उजाळा मिळाला.

ग्रामस्थ बरोबर आहे येथील ग्रामपंचायत प्रशासन व ग्रामस्थांशी बोलत होत्या यावेळी आप्पासाहेब जावळे, आनंदराव जावळे, निरंजन गुडघे, भिकाजी बोंडखळ, गणपत राऊत, बबलु जावळे,जनार्दन वायसे, राजेंद्र गोतिस अदी उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या अडचणी व ग्रामपंचायतीच्या विविध प्रकारच्या मागण्या ग्रामस्थांनी कोल्हे यांच्या पुढे मांडल्या. नकाशात असलेला रस्ता मिळाला. आता ग्रामपंचायतीला व्यवसायीक कर मिळावा. सोनेवाडी परिसरातील तरुणांना प्राधान्याने नोकरीसाठी कंपनीत संधी उपलब्ध करून द्याव्यात. परिसरातील रस्ते पक्के करावे. एमआयडीसी परिसरात सोनेवाडीच्या बाजूने मेन गेट करावे. एमआयडीसी परिसराला सोनेवाडी नावाचा काही अंशी उल्लेख करावा अदी मागण्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे कोल्हे यांनी सांगितले.

## संक्षीप्त वृत्त

### श्रीधर खरपुडे यांचे निधन



■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : केडगाव शास्त्रीनगर येथील रहिवासी श्रीधर मुरलीधर खरपुडे यांचे नुकतेच निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे ७० वय होते . त्यांच्या मागे पत्नी ,दोन मुले,तीन मुली ,सुना ,नातवंडे असा परिवार आहे . त्यांच्यावर केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते

### प्रयागाबाई मगर यांचे निधन



■ जनप्रवास प्रतिनिधी

टाकळीभान : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील जुन्या पिढीतील गं.भा.प्रयागाबाई सुखदेव मगर (९८) यांचे नूकतेच वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सूना, नातवंडे, पुतणे असा परिवार आहे.

### फोनपे आणि एचडीएफसी बँकेची भागीदारी; को-ब्रँडेड क्रेडिट कार्डचे लोकार्पण

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : भारतातील आघाडीची फिनटेक कंपनी फोनपे आणि एचडीएफसी बँक यांनी एकत्र येत ‘फोनपे एचडीएफसी बँक को–ब्रँडेड क्रेडिट कार्ड’ सादर केले आहे. या नव्या उपक्रमामुळे फोनपेने को–ब्रँडेड क्रेडिट कार्ड सेगमेंटमध्ये पहिल्यांदाच पाऊल टाकले असून, भारतीय ग्राहकांच्या वाढत्या आणि बदलत्या आर्थिक गरजांचा विचार करून तयार करण्यात आलेले हे कार्ड रूपे नेटवर्कवर आधारित आहे. विशेष म्हणजे, या कार्डद्वारे वापरकर्ते फोनपे अ‍ॅपवरून युपीआय क्यूआर कोड स्कॅन करून सहजपणे व्यवहार करू शकतात आणि त्यावर आकर्षक रिवॉर्ड्स मिळवू शकतात. हे कार्ड दोन व्हेरिएंट्समध्ये – ‘अल्टिमो’ आणि ‘युनो’ – उपलब्ध आहे. ग्राहकांच्या दैनंदिन खर्च जसे की रिचार्ज, बिल पेमेंट्स, ट्रॅव्हल बुकिंग्स, ऑनलाईन खरेदी, किराणा सामान किंवा कॅब बुकिंग यावर आकर्षक बक्षिसे (रिवॉर्ड पॉइंट्स) देण्यात येत आहेत.

### वैभव नाईकवाडी खून प्रकरणाचा तपास सीआयडीकडे द्यावा



■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : वैभव शिवाजी नाईकवाडी या युवकाच्या अमानुष खुनाच्या प्रकरणात पोलीस विभागाच्या निष्काळजीपणाचे गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीने केले आहेत. वैभवचा अपहरण करून निर्घृण खून करण्यात आला व मृतदेह केतकाई परिसरात जाळून टाकण्यात आला. या घटनेची माहिती पोलिस ठाण्याच्या एका अधिकाऱ्याला असूनही त्याने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी बुधवारी (दि. २५ जून) वंचित बहुजन आघाडीच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन सदर गुन्ह्याचा तपास सीआयडीकडे द्यावा व सदर पोलिस अधिकाऱ्याची आणि आरोपींची नार्को टेस्ट करण्याची मागणी करण्यात आली आहे. या शिष्टमंडळात मयत वैभवची आई सीमा नाईकवाडी यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे, शहराध्यक्ष हनिफ शेख, अ‍ॅड. योगेश गुंजाळ, जे.डी. शिरसाठ, देवीदास भालेराव, गणेश राऊत, प्रसाद भिवसने, राजीव भिंगारदिवे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### काळ माणसाला कधीच सोडू शकत नाही - हभप संपूर्णताई टेंबरे

■ जनप्रवास प्रतिनिधी

माळवाडगाव : काळ माणसाला कधीच सोडू शकत नाही परमानुसार सुखदु:ख हे भोगावे लागतात जन्मापासून ते मरेपर्यंत आपल्याला दु:खच असते असा उपदेश ह भ प साध्वी संपूर्णताई टेंभरे यांनी माळवाडगाव येथे प्रवचनातून भाविकांना केला.

कर्मानुसार माणसाला सुख दुख भोगावे लागते तेव्हा प्रत्येकाने कर्म चांगले करा अन्नदान देणगी दान वस्त्रदान ज्ञानदान करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे ते केलेच पाहिजे माणसाला सुख समाधान मिळत असते घडीचा आज भरोसा नाही पुण्याही करत जावे पाप पुण्य समान झाले पाहिजे हा सुंदर नरदीह चांगले कर्म करण्यासाठी दिला आहे माणसाला साधुसंत महात्मे हे सावध करण्याची महान कार्य करत असतात जीवन जगत असताना वेळेत वेळ भगवंताचे नामस्मरण चिंतन भजन करत जावे हे करत असताना आपल्या भाव शुद्ध असावा भावनेनुसार क्रिया घडत असतात माणसे मरणाला जास्त घाबरतात तरी मरणाला घाबरू नये असे निरूपण ह भ प संपूर्णताई टेंबरे नागपूरकर यांनी प्रवचनातून भाविकांना केले. मीना तेरे यांनी महाराजांचे संत पूजन केले तर अनिल अनुसे, सुनील अनुसे यांनी भाविकांना भोजन दिले पत्रकार विठ्ठलराव आसने यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### सेलिब्रिटी कॅपिटल आणि ईव्ही क्रांती: सुनील शेट्टी, केएल राहुल, अहान शेट्टी आणि अक्षै वर्डे एकत्र येऊन सादर करतात एक्सेलमोटो

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : भारतात इलेक्ट्रिक मोबिलिटी आता अधिक वेगवान, स्वच्छ, स्टायलिश आणि महत्त्वाकांक्षी बनली आहे. एक्सेलमोटो ची स्थापना प्रसिद्ध डिझायनर अँड ऑटोमोटिव्ह एन्ट्रेप्रेनेऊर अक्षै वर्डे यांनी केली असून, या उपक्रमाला अभिनेता–उद्योजक–मार्गदर्शक सुनील शेट्टी, क्रिकेट स्टार केएल राहुल आणि तरुणांचा आयकॉन अहान शेट्टीयांचा पाठिंबा आहे – ज्यामुळे विश्वासार्हता, कूलनेस आणि पिढ्यानपिढ्यांचा प्रभाव एकत्र येतो. एक्सेलमोटो ने जून २८ पासून प्री–ऑर्डर विंडो सुरू करण्याची घोषणा केली आहे. प्रथम ९९९ ई–बाईक साठी ४९९ मध्ये बुकिंग उपलब्ध आहे ` अधिकृत वेबसाइटवर: https://www.Egob‘moQ>mo.com या पारंपरिक इलेक्ट्रिक स्कूटर्स नाहीत ` या ई–बाईक आहेत, ज्या पेडल असिस्ट प्रणालीसह येतात, ज्यामुळे वापरकर्ते ऍक्टिव्ह राहू शकतात आणि त्यांचा कार्बन फूटप्रिंट लक्षणीयरीत्या कमी होतो. या सेगमेंटमधील किमीप्रती खर्चातही हे ई–बाईक सर्वात किफायतशीर आहेत.

# पाटस येथे धम्म यात्रेचे जोरदार स्वागत

## भिक्खू संघाची सेवा केल्याने समाजबांधव सुखावले

■ जनप्रवास प्रतिनिधी

पाटस : सालाबाद प्रमाणे यावर्षी देखील बुधवार (दि. २५) रोजी भीमा कोरेगाव ते पंढरपूर येथे निघणारी धम्म यात्रा पाटस गावात विश्र्वशांती बुद्ध विहार येथे मुक्कामी राहिली. पूज्य भंते ज्ञानज्योती यांचे अधिपत्याखाली या धम्म यात्रेचे आयोजन करण्यात येते.

भीमा कोरेगाव ते पंढरपूर निघालेल्या धम्म यात्रेच्या स्वागतासाठी संपूर्ण समाज पाटस येथील कारखाना चौक येथे एकवटला होता. या वेळी समस्त भिक्खू संघ यांचे पुष्पगुच्छ देऊन यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. या वेळी पाटस ग्रामपंचायत माजी ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र पानसरे, युवा विद्यमान सदस्य स्वप्नील भागवत,भारतीय बौद्ध महासभेचे कोकाटे सर,




बौद्धचार्य बोंडे सर, कृष्णा पानसरे, अरुण पानसरे, गौतम पानसरे, सतीश लोंढे, रोहिदास पानसरे, वसंत पानसरे, शंकर पवार, मयुर पानसरे, सूरज पानसरे, श्रेयश पानसरे, शिवधन पानसरे, अमोल पानसरे, किशोर खरात, मयुर पाटील, युवराज निकाळजे, मनोज पानसरे, संतोष पानसरे तसेच गावातील इतर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे आयोजन तक्षशिला बुध्द विहार ( राहुल युवक मंडळ) तसेच विश्र्वशांती बुद्ध विहार यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या प्रसंगी विश्र्वशांती बुद्ध विहार येथे भंतेजी यांचे प्रवचन झाले. या नंतर विहाराचे मयुर पानसरे यांनी सर्वांचे आभार मानत या सामाजिक क्रांती अभियानात सामील सर्व भिक्खू संघ यांची सेवा करण्याची संधी मिळाली तसेच आम्ही सर्वजण या अभियानात सामील आहोत असे मनोगत व्यक्त केले.

या नंतर सर्व भिक्खू संघ यांना निवास, उत्तम भोजनदान या सोबत भिक्खू संघ यांचे आरोग्याची विशेष देखभाल घेण्यात आली. त्यांना गावातील आरोग्य विभागाकडून आरोग्य सेविका संघमित्रा पानसरे व जागृती काकडे यांचे मार्फत आरोग्य तपासणी व मोफत औषध पुरवठा करण्यात आला होता.

सदर कार्यक्रमासाठी पाटस गावातील सर्व बुद्ध शिव फुले शाहू आंबेडकर विचारांचे सर्व युवा कार्यकर्ते यांनी विशेष मेहनत घेऊन यशस्वी केलेला हा कार्यक्रम तसेच युवा कार्यकर्ते यांचे मधील दिसून आलेली परिवर्तनाची लाट एकंदरित सर्व कार्याचा भिक्खू संघ तसेच गावातील सर्वच स्तरातून प्रशंसा आणि कौतुक होत असल्याचे दिसून आले. पुढील वर्षी याही पेक्षा अधिक चांगला कार्यक्रम करू असा विश्वास युवा कार्यकर्त्यांनी या वेळी केला.

# कोळगाव ची कन्या जयश्री पलांडे यांना पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार प्रदान

**सन २०२४- २५ चा प्रथम क्रमांक चा पुरस्कार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रदान**

■ जनप्रवास वार्ताहार

श्रीगोंदा : प्राथमिक शिक्षण, जिल्हा परिषद पुणे विभागाच्या वतीने सन २०२४-२५ मधील प्रथम क्रमांकाचा "उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार" जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वाबळेवाडी ता. शिरूर, जिल्हा पुणे येथील उपशिक्षिका जयश्री सुनील पलांडे यांना शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, विधानसभेचे उपसभापती अण्णा बनसोडे यांच्या शुभहस्ते नुकताच प्रदान करण्यात आला.

पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट शिक्षक पुरस्काराचे वितरण नुकतेच पुण्यामध्ये करण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वाबळेवाडी



येथील उपशिक्षका जयश्री सुनील पलांडे येथे कार्यरत असून आजपर्यंत त्यांचे १५६ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत आले असून २१ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत आले आहेत. एन. एम. एम. एस. शिष्यवृत्ती परीक्षेत ६१ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले असून सात विद्यार्थी नवोदय परीक्षेत यशस्वी झाले आहेत. त्यांनी राज्यस्तरावर तज्ञ मार्गदर्शक म्हणून काम केले असून, पुणे जिल्हा परिषदेतर्फे राबवण्यात येत असलेल्या मॉडेल स्कूल प्रकल्पासाठी त्यांची मेंटॉर म्हणून नुकतीच निवड करण्यात आली आहे. हॅकेथॉन स्पर्धेमध्ये त्यांच्या विद्यार्थ्यांनी पुणे जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तसेच यशवंतराव चव्हाण कला – क्रीडा स्पर्धेतही मार्गदर्शक म्हणून मोठे यश मिळवले आहे. त्यांच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी कविता गायन स्पर्धेत पुणे जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला असून बुद्धिबळ स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवला आहे. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना जिल्हा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, आमदार बाबाजी काळे, ज्ञानेश्वर कटके, बापूसाहेब पठारे, उपस्थित होते.

# मनरेगा कमिशन एजंट रानमळ व भोसले चौकशीच्या फेऱ्यात ?

■ जनप्रवास प्रतिनिधी

पाथर्डी : पाथर्डी पंचायत समितीत एमआरजीएस विभागात कमिशन एजंट कार्यरत असल्याचे वृत्त दैनिक जनप्रवास वृत्तपत्राने प्रकाशित केले होते यावर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी एमआरजीएस दक्षता व गुणनियंत्रण कक्षाची चौकशी समिती स्थापन करत पाथर्डी पंचायत समिती येथील मनरेगा विभागातील दत्तात्रय रणमळ व राहुल भोसले यांची चौकशी सुरू केली आहे. यामुळे पाथर्डी पंचायत समिती एकच खळबळ उडाली आहे.

पाथर्डी पंचायत समिती एमआरजीएस अंतर्गत गायगोठे व विहीर योजनेचा लाभ घेण्यासाठी पंचायत समिती एमआरजीएस

> पाथर्डी पंचायत समिती येथे जि प मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे गुरुवारी दक्षता गुणनियंत्रण तपासणी चौकशी समितीच्या अनुषंगाने मनरेगा विभागातील चार ते पाच तंत्रज्ञ अधिकारी मिळून एमआरजीएस विभागातील रेकॉर्ड तपासले आहे यावर अंतिम अहवाल तयार करून जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे दिला जाईल या एमआरजीएस विभागात दोषी आढळल्यास कारवाईस पात्र अधिकारी व कर्मचारी यांच्या बाबतीत वरिष्ठ निर्णय घेतील.
>
> –दिलीप सोनकुसळे (बिडिओ –एमआरजीएस विभाग जि.प.अहिल्यानगर)

विभागातील दलालांनी फिक्स रेट ठरवला आहे विहीर मंजुरी अनुदान मिळवून देणे कामी साठ हजार रुपये गाय गोठे मंजुरी व अनुदान मिळवून देणे कामी दहा हजार रुपये असा रेट ठरला आहे आणि यामधून एमआरजीएस विभागातील राहुल भोसले यांनी गाय गोठे प्रस्ताव मंजुरी साठी प्रत्येकी चार ते पाच हजार रुपये घेतल्याचा आरोप टप्पा पिंपळगाव येथील शेतकऱ्यांनी केला आहे यामुळे पाथर्डी तालुक्यातील एमआरजीएस विहीर गाय गोठे योजनेचा लाभ मिळवून देण्याच्या नावाखाली गोरगरीब लाभार्थ्यांची लाखो रुपयांची आर्थिक निवडणूक केली आहे.

केंद्र व राज्य सरकार संयुक्तरीत्या मिळून ग्रामीण भागातील शेतकरी कष्टकरी लाभार्थ्यांना मनरेगा योजनेअंतर्गत विहिरी मंजूर करण्यात आल्या या विहीर मंजुरीसाठी तीस हजार आणि विहीर बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मनरेगाचे विहीर योजनेचे अनुदान मिळवण्यासाठी प्रति विहीर मस्टर भरणे या कामी तीस हजार रुपये प्रत्येक गावातील ग्रामपंचायत ग्रामरोजगार सेवक आणि पंचायत समिती विस्तार अधिकारी दत्तात्रय रानमळ यांनी मिळून गोरगरीब शेतकरी कष्टकरी लाभार्थ्यांची आर्थिक फसवणूक केली आहे.

यामुळे पंचायत समिती एमआरजीएस विभागातील कमिशनसम्राट विस्तार अधिकारी दत्तात्रय रानमळ व राहुल भोसले यांचे तातडीने निलंबन करण्यात यावे अशी मागणी किसन आव्हाड यांनी केली आहे.

# आबासाहेबांचा एक तरी विचार प्रत्येकाने अंगीकृत करावा : सौ.रंजनाताई बेल्हेकर

■ जनप्रवास प्रतिनिधी

शेवगाव : आबासाहेबांचा एक तरी विचार प्रत्येकाने अंगीकृत करावा असे प्रतिपादन सौ.रंजनाताई सुरेश बेल्हेकर (विश्वस्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सुलोचना बेल्हेकर सामाजिक व बहुउद्देशीय शिक्षण संस्था , भानसहिवरा ) यांनी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे संस्थापक कर्मयोगी जगन्नाथ कान्होजी उर्फ आबासाहेब काकडे यांच्या १०६ व्या जयंती समारंभ प्रसंगी केले .

यावेळी विद्यालयातील इ. पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांची तसेच निर्मल ब्राईट फ्युचर स्कूल शेवगाव येथील विद्यार्थ्यांची शेवगाव शहरातून मोठ्या उत्साहात



भव्य व शिस्तबद्ध मिरवणूक काढण्यात आली .यामध्ये आबासाहेबांच्या प्रतिमेची आणि त्यांच्या जीवनावर लिहिल्या गेलेल्या पुस्तकांची पालखी मिरवणूक काढण्यात आली होती. मिरवणुकीमध्ये दिंडी पथक, कलश पथक,लेझीम पथक, झांज पथक, ढोल पथक सहभागी झाले होते. तलवारबाजी, दांडपट्टा, लाठी काठी,अशा मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिके यावेळी विद्यार्थिनींनी सादर केली व सर्व शेवगावकरांचे लक्ष वेधून घेतले . शेवगाव शहरातील या भव्य मिरवणूकीनंतर आबासाहेब काकडे विद्यालयात कर्मयोगी आबासाहेबांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले .यावेळी घेण्यात आलेल्या कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून रंजनाताई बेल्हेकर,आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे ०अध्यक्ष अ‍ॅड. डॉ.विद्याधरजी काकडे, विश्वस्थ सौ.हर्षदाताई काकडे,संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.डॉ.लक्ष्मणराव बिटाळ,प्राचार्य संपतराव दसपुते,निर्मल ब्राईट फ्यूचर स्कुलचे प्राचार्य दत्तात्रय मोरे,उपमुख्याध्यापिका पुष्पलता गरुड, कला विभाग प्रमुख प्रा.अशोक तमनर,पर्यवेक्षक सुनील आव्हाड,लक्ष्मण गाडे,प्रा रविंद्र आगळे, विद्यालयाचे माजी शिक्षक गोरक्षनाथ वावरे, संगीताताई नाईक तसेच पालक , आदी मान्यवर उपस्थित होते .

# इंग्रजकालीन जीर्ण कागदपत्रांना लॅमिनेशन

## राहाता भूमिअभिलेख कार्यालयात जमिनीचे जुने रेकॉर्ड सुरक्षित

राहाता(प्रतिनिधि)

इंग्रजकालीन टिपण तसेच फाळणी कागदपत्रे जीर्ण झाली असून त्यामुळे जमिनीची मोजणी होण्यात अडचणी निर्माण होतात त्यासाठी राहाता भूमिअभिलेख कार्यालयाने जुनी जीर्ण झालेली इंग्रजकालीन कागदपत्रे लॅमिनेशन करण्यास सुरुवात केली आहे . हे जुने जीर्ण रेकॉर्ड सुरक्षित ठेवण्यासाठी ही पद्धत सुरू केली आहेत .

आज आपल्या जमिनीचे उतारे काढण्यासाठी गट नंबर सांगावा लागतो, परंतु

> जुने अभिलेख व नकाशे फाटल्यामुळे जमिनीच्या मोजनित अडचणी येतात, त्यामुळे हे लॅमिनेशन केले जात आहे, त्यांचे स्कॅनिंग देखील केले जाणार आहे . त्यामुळे जुने जीर्ण कागदपत्र नष्ट होण्यापासून वाचणार असून जमीनदारांच्या जमिनी जुन्या रेकॉर्ड प्रमाणे मोजल्या जाणार आहे . मुख्यमंत्री महोदय यांच्या १०० दिवसीय उपक्रमाअंतर्गत हे काम सुरू असून पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे साहेब यांनी हे काम गतिमान करण्यासाठी विशेष लक्ष घातले आहेत .
>
> – योगेश थोरात, उपअधीक्षक भूमिअभिलेख, राहाता

इंग्रजकाळात जमिनीचे सर्व कागदपत्रे हे फक्त सर्व्हे नंबरणे केले जात होते . पिढ्यानपिढ्या पाठीमागे जमिनीचे हिस्से वाटप असेल तर इग्रजकालिन कागदपत्रे हाताळावी लागतात, दिवसेंदिवस ही कागदपत्रे अतिशय जीर्ण होत असल्याने व लोकांना ऑनलाईन पाहण्यासाठी आता ही कागदपत्रे लेमिणेशन करून स्कॅनिंग केले जाणार आहे, ही पद्धत राहाता



भूमिअभिलेख कार्यालयाने चालू केली आहेत .

टिपनात इंग्रजांनी जमिनीचे केलेले मोजणीचे रेकॉर्ड ठेवले जात होते, यात सर्व्हे नंबर असतो व फाळणी यात जमिनीच्या हिस्स्यांची नोंद तसेच नकाशे आहे . हे कागदपत्रे जतन करण्याचे काम सद्या सुरू आहे, या कार्यालयात इंग्रजककालिन १८७० पासूनचे जमिनीचे रेकॉर्ड आजही आहेत . आता या जीर्ण कागदपत्रांना लेमिनेशन झाल्यावर स्कॅन करून हे कागदपत्रे ऑनलाईन केले जाणार आहेत .

# ग्रामीण सोनार संघटनेतर्फे राज्यव्यापी वधुवर पालक परिचय मेळावा

■ जनप्रवास प्रतिनिधी

टाकळीभान : ग्रामीण सोनार संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने भव्य असा राज्यव्यापी वधूवर पालक परिचय मेळावा व सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन रविवार दि.२९ जुन रोजी टाकळीभान येथील रूख्मिणीमाधव मंगल कार्यालयात करण्यात येणार असल्याची माहीती संस्थापक अध्यक्ष मधुकर मैड यांनी दिली. वधुवर मेळाव्याचे अध्यक्षस्थानी विलासराव भांबुर्डेकर हे असणार आहे. तर प्रमूख सुत्रधार गोविंद अंबिलवादे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

सकाळी १० वा. श्री श्री श्री १००८ महामंडलेश्वर दत्तात्रय महाराज दहिवाळ(लाडगाव संस्थान), ह.भ.प. नवनाथराव दहिवाळ (खरवंडीकर), जयप्रकाश बेदरे (ऊरूळीकांचन), अंजलीताई धानोरकर (उपजिल्हाधिकारी) यांच्या व इतरमान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून कार्यक्रमास सुरूवात होणार असून या कार्यक्रमास ना. माधुरीताई मिसाळ(नगरविकास, परिवहन, सा.न्याय राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य), ना.मेघनाताई साकोरेबोर्डीकर (राज्यमंत्री, सार्वजनीक आरोग्य, कुटूंब कल्याण, महिला व बालविकास), आ.चित्राताई वाघ यांची उपस्थिती असणार आहे. सकाळी ११ ते दुपारी १.३० पर्यंत वधुवर परिचय पहिले सत्र पार पडणार असून दुपारी १.३० ते २.३० या वेळेत स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी २.३० ते सायं.५ पर्यंत वधुवर परिचय द्वितीय सत्र पार पडणार असून सायं.५ वा. प्रायोजीत शुभविवाह सोहळा संपन्न होणार असल्याची माहीती आयोजकांनी दिली आहे.

# वायरमन शितल हुलगुंडे यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल

■ जनप्रवास प्रतिनिधी

जामखेड : शेतामध्ये काम करीत असताना तुटलेल्या तारांना स्पर्श होऊन काकासाहेब शिकारे व महेश शिकारे या दोघां पितापुत्राच्या मृत्यूस कारणीभूत असल्याचा सदोष मनुष्यवधाचा गुन्हा अखेर वायरमन शितल हुलगुंडे याच्यावर खर्डा पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाला आहे.

याबाबत माहिती अशी की,दि२३ जून २०२५ रोजी काकासाहेब शिकारे वय ४४ वर्षे व त्यांचा मुलगा महेश शिकारे वय १५वर्षे हे दोघे पितापुत्र शेतामध्ये खते टाकत असताना तुटलेला वीजतारांना चिटकून शॉक बसल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता.या भागातील ड्युटीवर असलेले वायरमन शितल मधुकर हुलगुंडे यांनी बाळगव्हाण शिवारातील विजेच्या इलेक्ट्रिक तारा तुटल्याने वीज कनेक्शन बंद




न केल्यास कोणाचाही जीव जाऊ शकतो हे माहीत असताना सुद्धा व सदरच्या तुटलेल्या तारा त्यांना सांगूनही त्यांनी काही एक दुरुस्ती केली नाही तारा मधील करंट बंद केला नाही. कामात हलगर्जी पणा केल्यामुळे सदरच्या तुटलेल्या तारांना शिकारे पिता, पुत्रांचा मृत्यूस कारणीभूत असल्याचा सदोष मनुष्यवादाचा गुन्हा गुन्हा इंद्रराज सदाशिव शिकारे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रजिस्टर गुन्हा पोलीस ठाणे अंमलदार एस.जी. धामणे यांनी दाखल करून घेतला आहे. याबाबत पुढील तपास खर्डा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत हे करीत आहेत.

### एथर एनर्जीच्या ईव्ही स्कूटर्सला दमदार प्रतिसाद; पावसाळी हवामानातही उत्तम कामगिरी

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : भारतात पावसाळ्याच्या दिवसांत वाहतूक करताना नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. निसरडे रस्ते, खड्डे, साचलेले पाणी आणि समोरचे धूसर दृश्य – हे सर्व प्रवास अधिक कठीण करतात. पारंपरिक दुचाकींना या परिस्थितीत थांबावे लागते, मात्र इलेक्ट्रिक स्कूटर्सच्या नव्या युगातही 'पावसातही सुरक्षित प्रवास शक्य आहे' असा विश्वास निर्माण झाला आहे.

सध्या देशात इलेक्ट्रिक वाहनांना मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असून, यामध्ये एथर एनर्जी ही कंपनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण करत आहे. कंपनीने भारतीय रस्ते आणि हवामानाचा अभ्यास करून स्कूटर्सची रचना केली आहे. एथरच्या स्कूटर्स पावसाळ्याच्या हवामानातही सुरळीत आणि सुरक्षितपणे धावतात. स्कूटरमधील महत्त्वाचा भाग असलेल्या बॅटरीचे विशेष रक्षण करण्यात आले असून, या बॅटरीवर तब्बल २७० चाचण्या करण्यात आल्या आहेत.

# लोकनेते स्वर्गीय प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिरात १८७ जणांनी केली रक्तदान

■ जनप्रवास प्रतिनिधी

इंदापूर : लोकनेते स्वर्गीय प्रतापसिंह मोहिते – पाटील यांच्या वतीने अकलूज येथे गोळीबार चौक येथे भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिराचे उद्घाटन डॉ. धवलसिंह मोहिते–पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या शिबिरात १८७ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

यावेळी बोलताना धवलसिंह मोहिते– पाटील म्हणाले की, सध्या महाराष्ट्रात रक्ताचा मोठ्या प्रमाणात तुटवडा असल्यामुळे आम्ही प्रतापसिंह मोहिते–पाटील यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करून आरोग्य विभागाला मदत करण्याचा प्रयत्न केला आहे. यावेळी जनसेवा संघटनेचे सतीश पालकर, सुधीर रास्ते, अण्णासाहेब इनामदार,




राजाभाऊ गुळवे, विठ्ठल इंगळे, बापू मगर, नवनाथ साठे, मयूर माने, ज्योती कुंभार, संजय गाडे, राहुल शहाणे, प्रताप कोकिळ, सागर साळुंखे, अरुण शहाणे, पिंटू वैद्य, शेखर शेंडे, अनिल सोनार, रघुनाथ साठे आदी उपस्थित होते.

जुने पोलीस स्टेशन येथे जनसेवा कामगार संघटना शाखेचे उद्घाटन डॉ. धवलसिंह मोहिते–पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी भारत हणवते, आप्पा अवघडे, गोविंद पवार, रोहिदास हणवते, साधू खंडागळे, किशोर साठे, दत्ता काळोखे, अनिल बनपट्टे, दीपक लोंढे आदी उपस्थित होते. तसेच उपजिल्हा रुग्णालय येथे गरोदर महिलांना सुंठवडा–डिंकवडा चे वाटप करण्यात आले.

# सार्वजनिक उपक्रम समितीचे अध्यक्ष ॲड.राहुल कुल यांच्या समितीकडून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची पाहणी

■ जनप्रवास प्रतिनिधी

यवत : सार्वजनिक उपक्रम समितीचे अध्यक्ष ॲड. आमदार राहुल सुभाष कुल यांच्या अध्यक्षतेखाली समितीच्या सदस्यांनी आज नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा सखोल पाहणी दौरा केला. या विमानतळाद्वारे देशांतर्गत विमान वाहतूक सेवा लवकरच सुरू होणार असून त्यानंतर आंतरराष्ट्रीय सेवा सुरू करण्याचे विमान प्राधिकरणाचे नियोजन आहे.

या विमानतळ पाहणी दौऱ्यासाठी सार्वजनिक उपक्रम समितीचे सदस्य आणि आमदार मिलिंद नार्वेकर, आमदार सुभाष देशमुख, आमदार भिमराव तापकीर, आमदार संभाजीराव कोहळीकर, आमदार वरुण सरदेसाई, आमदार संजय पोतनीस, आमदार हेमंत ओगले, आमदार निरंजन डावखरे, आमदार चंद्रकांत रघुवंशी, आमदार शिवाजीराव गर्जे, आमदार रईस शेख, आमदार धर्मरावबाबा अत्राम तसेच आमदार विलास भुमरे हे उपस्थित होते.

आमदार ॲड.राहूल कुल यांच्या अध्यक्षतेखाली या समितीच्या वतीने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विविध विभागांची सखोल पाहणी करण्यात आली तसेच विमानतळावरील विविध सुविधा जसे, टर्मिनल, रनवे, पार्किंग, स्वच्छता, विद्युत पुरवठा,



विमानतळावर आणि कर्मचारी कॉलनीसाठी पाण्याची उपलब्धता व व्यवस्था, सुरक्षा कर्मचाऱ्यांची तैनाती, सीसीटीव्ही, आणीबाणीची तयारी, प्रवाशांच्या सोयीसुविधा ज्यामध्ये प्रतीक्षागृह, जेवणाची सोय, वायफाय, शौचालय, इमारतींमधील सुगमता आणि कर्मचारी वर्गासाठी आवश्यक सेवा ज्यामध्ये कर्मचारी कॉलनी, आरोग्य सुविधा, वाहतूक इत्यादीची पाहणी करण्यात आली.

समितीने संपूर्ण इन्फ्रास्ट्रक्चरचे निरीक्षण करून प्रवाशांच्या सुरक्षितता, सुविधा आणि कर्मचारी कार्यक्षमतेसाठी आवश्यक सुधारणा सुचवल्या.

सार्वजनिक उपक्रम समितीच्या पाहणी दौऱ्यावेळी सिडकोचे वरिष्ठ अधिकारी श्री. विजय सिंघल (उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको) –श्री. शान्तनु गोयल, (सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको)– डॉ. राजा दयानिधी (सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको) श्री. गणेश देशमुख, (सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको) श्री. सुरेश मेंगडे, (मुख्य दक्षता अधिकारी, सिडको) हे आवर्जून उपस्थित होते.

यावेळी सिडकोच्या अधिकाऱ्यांनी विमानतळाच्या व्यवस्थेबाबत समितीला सविस्तर माहिती दिली. त्यावेळी सार्वजनिक उपक्रम समितीने प्रवाशांच्या सुरक्षितता आणि सोयीसुविधा यांना प्राधान्य देत आवश्यक सुधारणा करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या. समितीच्या पाहणी दौऱ्यामध्ये समितीकडून अधिकाऱ्यांना ज्या सुचना करण्यात आल्या आणि जे उपाय सुचविण्यात आले त्यामुळे या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर प्रवाशांना तसेच कर्मचारी वर्गाला उत्कृष्ट, सुरक्षित आणि आधुनिक सुविधा उपलब्ध होण्यासाठी मदत मिळणार आहे.

असा आहे हा प्रकल्प – नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा मुंबईजवळील कोपर–पनवेल भागात उभारला जाणारा ग्रीनफिल्ड विमानतळ आहे. हा प्रकल्प सिडको (महाराष्ट्र सरकार) तसेच भारतीय विमानतळ प्राधिकरण आणि अदानी समूह यांच्या संयुक्त भागीदारीत उभारला जात आहे.

# अमली पदार्थ विरोधी दिन व शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात अमली पदार्थ विरोधी दिन व सामाजिक न्यायाचे प्रणेते छत्रपती शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राहुरी पोलीस स्टेशनचे निरीक्षक श्री. संजय ठेंगे उपस्थित होते.




अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती घडविण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. अमली पदार्थ म्हणजे काय, त्याचे होणारे परिणाम, आणि त्यापासून दूर राहण्याचे महत्व यावर ठेंगे यांनी सखोल मार्गदर्शन केले. मोठ्या शहरातील अनेक विद्यार्थी शालेय वयातच व्यसनाधीन होतात. मित्रांच्या संगतीत अडकून काहीजण गुन्हेगारीकडे वळतात, त्यामुळे या सर्वांचे दुष्परिणाम केवळ व्यक्तीवरच नाही तर संपूर्ण कुटुंबावर होतात, असे त्यांनी सांगितले.

त्याचप्रमाणे, मोबाईलचे व्यसन, ई–सिगारेट, वेगवेगळी पेये यासारख्या नव्या स्वरूपातील व्यसनांपासूनही सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वतः व्यसनांपासून दूर राहावे तसेच पालकांनीही प्रेमाने व्यसनमुक्त होण्याचा सल्ला दिला.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी व्यसनमुक्तीची शपथ घेतली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्री. अरुण तुपविहिरे होते. त्यांनी आपल्या भाषणात छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा वारसा पुढे नेत धर्मनिरपेक्षता, विवेकवाद व वैज्ञानिक दृष्टिकोन आचरणात आणण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विद्यार्थिनी कार्तिकी सोनवणे हिने केले, तर आभार प्रदर्शन वाल्मिक कुलकर्णी यांनी केले.

या प्रसंगी उपमुख्याध्यापक बाळासाहेब डोंगरे, पर्यवेक्षक मनोज बावा, रवी हरिश्चंद्रे, संदीप कुंभारे, तुकाराम जाधव, हलीम शेख, अनघा सासवडकर, सुरेखा आढाव, सचिन सिन्नरकर, बाबासाहेब शेलार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जागृती निर्माण झाली असून व्यसनमुक्ती व सामाजिक समतेचे महत्व अधोरेखित करण्यात आले आहे.

# वैकुंठवासी ह.भ.प. सखाराम महाराज अमळनेरकर दिंडीचे शेवगावात उत्साहात स्वागत

■ जनप्रवास प्रतिनिधी

शेवगाव : या बाबत सविस्तर वृत्त असे कि ३०० वर्षांची परंपरा असलेली श्री.सखाराम महाराज अमळनेरकर विठ्ठल रुक्मिणी संस्थान अमळनेर जिल्हा जळगाव येथून दर वर्षी सुमारे ७५० की. मी. पाई आषाढी वारी अमळनेर ते पंढरपूर ला जाणारी प्रसाद महाराज यांचे अधिपत्याखाली जाणारी दिंडी आपल्या शेवगाव शहराला पवित्र पदस्पर्श करून पुढे मार्गस्थ होते.

बुधवार दि २५ जुन वार बुधवार रोजी मारवाडी गल्ली मधील बालाजी मंदिरा मध्ये दिंडी सोहळ्याचे भव्य स्वागत करण्यात आले यावेळी प्रसाद महाराज यांचे प्रणव संजय संजय शेवाळे यांनी सपत्नीक पाद्यपूजन केले सुमारे ४०० ते ५०० वारकऱ्यांची वैद्यकीय सेवा महाप्रसादाची आणि पालखी मुक्कामाची सोय शेवाळे सराफ यांच्या मार्फत करण्यात आली. शेवगांव शहरातील सर्व भाविक भक्त व दिंडीतील वारकरी यांना महाप्रसाद भोजन दरवर्षी दिले जाते. या सर्व वारकऱ्यांची सेवा करण्याची दर वर्षी शेवगावचे सराफ संजय शेवाळे यांच्याकडे असते, व त्यांना ही सेवा पांडुरंगा चरणी अर्पण करण्याची संधी मिळते,पंढरपूर मधे सर्वात मानाची पहिली दिंडी श्री.सखाराम अमळनेरकर महाराजाची असते. आपल्या शेवगाव करांचे फार मोठे भाग्य आहे की साक्षात श्री. सखाराम महाराजांना भगवंत पांडुरंगानी दृष्टांत देऊन त्यांना पंढरपूर च्या चंद्रभागेच्या वाळवंटामध्ये पांडुरंगाची अत्यंत तेजस्वी स्वयंभु मूर्ती साक्षात प्रकट झाली आहे. ती मनमोहक मूर्ती महाराजांबरोबर पाई दिंडी मधे दरवर्षी सहभागी असते. शेवगांव शहरात महाराजांचे निसिम्म भक्त असणारे श्रीराम मंदिराचे राजेंद्र गालफाडे सुहास गालफाडे श्री संजूदेवा मुळे ऍड. लक्ष्मीकांत वेलदे प्रसाद प्रकाश डोम श्री सुभाष खांदाट श्री. शिवाजी धनगर श्रीराम कॉलोनी शेवगांव येते महाराज त्यांच्या भक्तांच्या भेटीला व आशीर्वाद देण्यासाठी जात असतात यावेळी शहरातील हजारो भाविक भक्त त्यांचे दर्शन घेऊन दिंडीचे पुण्य आपल्या पदरात पाडुन घेत असतात यानंतर दिंडी पाथर्डी मार्गे पंढरपूरकडे रवाना होते.

यात शेवगांव पाथर्डीचे अनेक भक्त असतात. या पायी दिंडी सोबत झी मराठी वहिनी वरील "राशि भविष्य" या कार्यक्रमामुळे महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेले. नाशिकचे वेद शाश्त्र संपन्न अतुल शाश्त्री भगरे गुरुजी देखील असतात संपूर्ण दिंडी पायी प्रवास ते आपले गुरुबंधु प्रसाद महाराज यांच्या सोबत करतात.

# वांबोरी येथे घरफोडी व चोरीचे सत्र सुरुच; पंधरा दिवसांत चार ठिकाणी घरफोडीच्या घटना

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे घरफोडी व चोरीचे सत्र सुरुच आहे. गेल्या पंधरा दिवसांत चार ठिकाणी घरफोडीच्या घटना घडल्या आहेत. २४ जून रोजी रात्रीच्या सुमारास वांबोरी येथील संतोष वांढेकर हे गाढ झोपेत असताना अज्ञात भामट्यांनी घरात प्रवेश करुन घरातील दिड तोळ्याचे सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम चोरुन नेली.

संतोष पोपट वांढेकर, वय २४ वर्षे, हे राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे कुटुंबासह राहतात. दि. २४ जून २०२५ रोजी रात्री ९.३० वाजेच्या सुमारास संतोष वांढेकर व त्यांच्या कुटुंबातील इतर लोक जेवण करून झोपी गेले होते. त्यापूर्वी त्यांनी घराचा मेन दरवाजा बंद केला. परंतू पाठीमागिल दरवाजा आतुन लॉक करण्याचा राहुन गेला होता. तो फक्त लोटलेला होता. रात्री ११.३० वाजे दरम्यान संतोष वांढेकर यांना जाग आली असता त्यांना घराचा पाठीमागील दरवाजा उघडा दिसला. तसेच घरातील कपाटातील सामान आस्ताव्यस्त पडलेले दिसले. या दरम्यान अज्ञात भामट्यांनी संतोष वांढेकर हे गाढ झोपेत असताना पाठीमागील दरवाजाने घरात प्रवेश केला. आणि कपाटातील दिड तोळा वजनाचे सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने तसेच १९ हजार रुपए रोख रक्कम चोरुन नेल्याचे लक्षात आले. घटनेची माहिती मिळताच पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली.

संतोष पोपट वांढेकर यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा रजि. नं. ७१०/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (अ) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. वांबोरी परिसरात सतत होत असलेल्या चोरी व घरफोडीच्या घटनेने परिसरातील नागरीक भयभीत झाले आहेत. पोलिस प्रशासनाने परिसरात गस्त वाढवावी. तसेच चोरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली.

# नांदूर निंबादैत्य येथे सौर ऊर्जा विद्युत वाहिनी विजेचा स्फोट

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

पाथर्डी : पाथर्डी तालुक्यातील वादग्रस्त जीएसई सोलर ऊर्जा प्रा.लि.या कंपनीने ३३ के.व्ही मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्प टाकला आहे विद्युत केंद्र येळी १५ मेगावॅट विद्युत केंद्राला दैत्यनांदूर येथील जीएसई सोलार ऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून ५ मेगाव्हेट ऊर्जा पुरविली जाते.

जीएसई सोलर ऊर्जा प्रकल्प कंपनीने जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम उपविभाग पाथर्डी रस्ते विकास ग्रामीण मार्ग प्रजीमा १४ व ३८ रस्त्यालगत बेकायदेशीर ४९ विद्युत वाहिनी पोल टाकले असल्याने जि.प व सार्वजनिक बांधकाम उपविभाग पाथर्डी यांच्याकडून जीएसइ सोलर ऊर्जा प्रकल्प कंपनीला शासनाचे

> दैत्यनांदूर गावात गुरुवारी आनंदराव देशमुख या गृहस्थाच्या दुकानासमोर जीएससीई रेनेबल सौर ऊर्जा विद्युत रोहित्र लाईनचा स्फोट होऊन पोलवरील पाच–सहा पक्षी मृत पावले परंतु आनंद देशमुख यांच्या किराणा दुकानापाशी बसलेली चार–पाच व रस्त्याने जात असणारे पाच ते सहा माणसं थोडक्यात बचावली तूर्तास या विद्युत वाहिनी मध्ये फक्त ५ मेगावॅट वीज चालू आहे कदाचित १० ते १५ मेगावॅट वीज चालू असती तर असा स्फोट भविष्यात उद्भवला तर रस्त्यालगत असलेल्या विद्युत वाहिनीमुळे मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही यामुळे बेकायदेशीर टाकलेले ४९ विद्युत वाहिनीचे पोल तातडीने इतरत्र स्थलांतरित करून जीएसई रिन्यूएबल सोलार प्रकल्पावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

> पाथर्डी विद्युत महावितरण उपअभियंता मयूर जाधव यांना दैत्यनांदूर घटनेवर त्यांची प्रतिक्रिया विचारण्यासाठी फोन केला असता त्यांनी पत्रकार दादासाहेब खेडकर यांना धमकावणे सुरू केले आणि तुम्हाला पाहून घेऊ असे म्हणत एक प्रकारे धमकी दिली मयूर जाधव यांच्या गैरवर्तनामुळे भगवानगड परिसर प्रेस क्लब पत्रकार संघटनेने उपअभियंता मयूर जाधव या अधिकाऱ्याचे तातडीने निलंबन करण्याची मागणी करणार असल्याचे सांगितले आहे.



मार्गदर्शक तत्त्व व शासन निर्णय टीपीएस १८१९/ ०८/०५/२०१९ अटी शर्तीचा भंग केल्याप्रकरणी ३३ के.व्ही विद्युत रोहित्र लाईन टाकण्यासाठी दिलेला परवाना रद्द करत ४९ बेकायदेशीर विद्युत पोल काढून घेण्याचे लेखी आदेश विद्युत महावितरण उपविभाग पाथर्डी व जीएसई रिनेव्हल प्रा.लि.कंपनीला दिले आहेत यावरून जेसीई रिनेबल सोलर ऊर्जा प्रकल्पाचे ४९ बेकायदेशीर विद्युत पोल काढण्याच्या कारवाईकडे लक्ष लागले आहे.

# छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक पुरस्काराचे वितरण मंगळवारी

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : स्वर्गवासी कमलाबाई रसिकलाल धारिवाल पुरस्कृत 'छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक स्पर्धा पुरस्कार' वितरण सोहळा व दिवाळी, ख्रिसमस, रमजान निमित्ताने प्रकाशित होणाऱ्या अंकांच्या प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. १ ते ४ जुलै २०२५ या कालावधीत सकाळी ११ ते सायंकाळी ८ या वेळेत आयोजित प्रदर्शनाचे उद्घाटन मंगळवारी (ता. १ जुलै) सकाळी ११ वाजता बालगंधर्व रंगमंदिराच्या कलादालनात माजी संमेलनाध्यक्ष व संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते, धारिवाल इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाशशेठ धारिवाल यांच्या हस्ते होणार आहे. पुरस्काराचे यंदा नववे वर्ष असून, पुरस्कार वितरण सोहळा संध्याकाळी ५ वाजता गणेश सभागृह, टिळक रस्ता पुणे येथे प्रसिद्ध अभिनेत्री डॉ. निशिगंधा वाड, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी, ज्येष्ठ लेखिका सिसिलिया कार्व्हालो, संमेलनाचे माजी अध्यक्ष भारत सासणे यांच्या उपस्थितीत होणार आहे, अशी माहिती दिनमार्क पब्लिकेशनचे दिनकर शिलेदार यांनी दिली. प्रसंगी साहित्यिक माधव राजगुरू उपस्थित होते.

दिनकर शिलेदार म्हणाले, "ही स्पर्धा दिवाळी अंकांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यात येते. यंदा स्पर्धेत ख्रिसमस सणाच्या निमित्ताने वसई येथून प्रकाशित होत असलेल्या अंकांच्या प्रवेशिका, तसेच रमजान सणानिमित्त प्रकाशित होणार 'नब्ज' हा अंक स्पर्धेसाठी स्वीकारण्यात आला आहे.

# २९ जून रोजी इंदापूर मध्ये होणार संत तुकाराम महाराज पालखीचे आगमन

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

इंदापूर : इंदापूर शहरात जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे रविवार,२९ जून रोजी आगमन होणार आहे. जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यानिमित्त इंदापूर नगरपरिषद प्रशासनामार्फत पालखीच्या स्वागताची जय्यत तयारी केली असून उत्तम अशा प्रकारे पूर्वनियोजन करण्यात आले आहे.



शहरात १३ सार्वजनिक शौचालये असून पालखी कालावधीसाठी निर्मलवारी अंतर्गत अतिरीक्त १२०० मोबाईल टॉयलेट उपलब्ध करण्यात आले आहेत. शहरातील रिंगण सोहळा ते पालखी मुक्कामाचे ठिकाण, परतीचा मार्ग व शहरातील सर्व ठिकाणचे रस्ते,सर्व सार्वजनिक शौचालये,मोबाईल टॉयलेट दिवे दुरुस्त करून चालू करण्यात आले आहेत.

रयत शिक्षण संस्थेच्या सौ, कस्तुराबाई श्रीपती कदम विद्यालय,इंदापूर यांचे प्रांगणात गोल रिंगण आखणेत आले आहे.रिंगण सोहळ्याचे ठिकाणी पालखी ठेवण्याकरिता मंडप व स्टेजची उभारणी करणेत येत आहे.रिंगणाचे बॅरिकेटिंग करणेत आले आहे.पालखी तळावर सी सी टी व्ही कॅमेरे बसविण्यात येणार असून येणाऱ्या भाविकांना रिंगण सोहळा पाहता यावा म्हणून डिजिटल स्क्रीन ची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. नगरपरिषदकडे १ अग्निशमन वाहन असून पालखी सोहळ्यासोबत सदर वहन २४ तास राहणार असून त्यावर प्रशिक्षित कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नगरपरिषदेमार्फत पालखी आगमनापासून प्रस्थानापर्यंत पालखी सोहळयातील वारक–यांच्या सेवा/सुविधासाठी नगरपरिषदने २४ तास दक्षता घेणेसाठी १० संवर्ग अधिका–यांची व ८० नगरपरिषद कर्मचारी यांची नेमणूक केली आहे.

# इंदापूरच्या आश्रमशाळेत लोकराजा राजर्षी शाहू महाराजांची जयंती साजरी

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

इंदापूर : इंदापूरच्या भिमाई आश्रमशाळेत राजर्षी शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय दिन साजरा करण्यात आला. यावेळी मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट इंदापूर या शिक्षण संस्थेच्या अंकित असणाऱ्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रमशाळा तसेच मुलांचे आणि मुलींचे अनुदानित वसतिगृह यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक संकुलात राजर्षी शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते माऊली नाचण यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार,



तथागत गौतम बुद्धांच्या मूर्तीस व दिवंगत रत्नाकर (तात्या) मखरे यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांची भाषणं झाली. प्रा. जावेद शेख यांनी भाषणातून शाहू महाराजांच्या जीवन कार्यावर विचार व्यक्त करत त्यांच्या कार्याला उजाळा दिला.

माऊली नाचण यांनी शाहू महाराजांवर स्वतः लिहिलेली कविता उपस्थितांसमोर सादर केली.यावेळी संस्थेचे सचिव ॲड.समीर मखरे, मुख्याध्यापक साहेबराव पवार, प्राचार्या अनिता साळवे, संचालक गोरख तिकोटे, विद्यार्थी,शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. हिरालाल चंदनशिवे यांनी सूत्रसंचालन केले.

# हृदयाच्या नसा बंद झाल्याची ही १० लक्षणे करू नका इग्नोर, झोपेतच होईल हार्ट बंद

हार्ट ब्लॉकेजच्या या १० लक्षणांकडे अजिबात कानाडोळा करू नका नाहीतर जीवावर बेतू शकतं. झोपेतच कधी हार्ट बंद पडेल आणि हार्ट अटॅक येईल सांगताही येत नाही. खालील लक्षणं व संकेतांवरून घरच्या घरीच हार्ट ब्लॉकेज आहे की नाही हे तपासा.

हृदय ही आपल्या शरीरातील सर्वात महत्त्वाची आणि अविरतपणे कार्य करणारी यंत्रणा आहे. पण जसजसे वय वाढत जाते, तसे अनेक सवयी आणि चुकीचे आहार-जीवनशैली यामुळे हृदयावर परिणाम होतो. विशेषतः हार्ट ब्लॉकेज ही समस्या हल्लीच्या काळात तरुणांमध्येही दिसून येत आहे. ही अशी स्थिती असते, जेव्हा हृदयाच्या रक्तवाहिन्यांमध्ये चरबी, कोलेस्टेरॉल किंवा इतर पदार्थ साचून रक्तप्रवाह अडथळित होतो. सुरुवातीला याचे लक्षणं फारसे दिसून येत नाहीत, पण जसजसा ब्लॉकेज वाढतो, तसतसे शरीरात गंभीर इशारे दिसू लागतात.

श्वास घेण्यास त्रास होणे, छातीत जडपणा जाणवणे, थकवा येणे ही काही लक्षणं सुरुवातीला फारशी लक्षात घेतली जात नाहीत आणि त्यामुळे परिस्थिती बिघडू शकते. यामध्ये वेळेवर निदान व योग्य उपचार हे अत्यंत महत्त्वाचे ठरतात. चला तर जाणून घेऊया हार्ट ब्लॉकेजची कारणं, लक्षणं, उपचार व त्याचा प्रतिबंध कसा करावा.

**हृदयातील ब्लॉकेज म्हणजे नेमकं काय?**

हार्ट ब्लॉकेज म्हणजे हृदयाच्या रक्तवाहिन्यांमध्ये चरबीसदृश प्लॅक तयार होणे. या प्लॅकमुळे रक्ताचा प्रवाह हळूहळू अडथळित होतो. अनेकदा हा प्लॅक हळूहळू वाढत जातो आणि एक दिवस अचानक रक्तप्रवाह पूर्णतः थांबतो, ज्यामुळे हार्ट अटॅक होण्याचा धोका निर्माण होतो. याला 'कोरोनरी आर्टरी डिसीज' असेही म्हटले जाते. हे ब्लॉकेज १०%, ३०% किंवा ९०% पर्यंत असू शकते आणि यावर उपचाराची पद्धत ठरते.

**कोणती कारणं हार्ट ब्लॉकेज वाढवतात?**

हार्ट ब्लॉकेजच्या मुख्य कारणांमध्ये चुकीचा आहार (जास्त चरबीयुक्त, तेलकट पदार्थ), धूम्रपान, मद्यपान, व्यायामाचा अभाव, सततचा तणाव, आणि मधुमेह यांचा समावेश होतो. यासोबतच वाढलेले कोलेस्टेरॉल, उच्च रक्तदाब, आणि लठ्ठपणाही हार्ट ब्लॉकेजसाठी कारणीभूत ठरतात. बदलत्या जीवनशैलीमुळे आजच्या तरुणांमध्येही ही स्थिती वाढत आहे.

## या ट्रिकने घरीच ओळखा हार्ट ब्लॉकेज



**हार्ट ब्लॉकेजची लक्षणं कोणती असतात?**

ब्लॉकेजचे लक्षणं सुरुवातीला सौम्य असतात आणि त्यामुळे दुर्लक्ष केले जाते. पण पुढील लक्षणं दिसल्यास तात्काळ तपासणी आवश्यक आहे.

छातीत दाब, जडपणा किंवा वेदना

श्वास घेण्यास त्रास

अति थकवा आणि अशक्तपणा

हात, खांदा किंवा पाठीमध्ये जाणवणारी वेदना

चालताना, पायऱ्या चढताना किंवा थोडासा व्यायाम करताना दम लागणे

**चक्कर येणे**

विश्रांतीनंतरही अशक्तपणा वाटणे

मेहनत न करताही घाम येणे

गॅस, अपचन, छातीत जळजळ होणे

रक्तप्रवाह कमी झाल्यामुळे पायात वेदना होणे

हार्ट ब्लॉकेजची तपासणी आणि उपचार पद्धती

ब्लॉकेजची खात्री करण्यासाठी ECG, Echocardiography, Stress Test, CT -ngiograph किंवा Coronary -ngiography यासारख्या चाचण्या केल्या जातात. ब्लॉकेज कमी असल्यास औषधांनी नियंत्रणात ठेवता येते. पण जर ब्लॉकेज ७०% पेक्षा जास्त असेल, तर 'अँजिओप्लास्टी' किंवा 'बायपास सर्जरी' अशा उपायांची गरज भासते. यासाठी हृदयरोगतज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

ब्लॉकेज टाळण्यासाठी जीवनशैलीत करा हे बदल

हार्ट ब्लॉकेजपासून बचाव करण्यासाठी काही सवयी आत्मसात करणे आवश्यक आहे. दररोज किमान ३० मिनिटांचा व्यायाम, ताजं आणि कमी तेलकट अन्न, पुरेशी झोप, तणावाचे व्यवस्थापन, धूम्रपान-मद्यपानापासून दूर राहणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासोबतच नियमित आरोग्य तपासणी करून कोलेस्टेरॉल, रक्तदाब आणि ब्लड शुगर नियंत्रणात ठेवणं आवश्यक आहे.

हृदयावर होणारा ताण आपण आपल्या सवयींमधून निर्माण करतो आणि त्यावर उपायही आपल्या हाती असतो. हार्ट ब्लॉकेज ही गंभीर समस्या असली तरी ती वेळेवर ओळखून टाळता येऊ शकते. त्यामुळे तुमचं हृदय निरोगी ठेवण्यासाठी आत्ताच जागरूक व्हा आणि आवश्यक बदल करून दीर्घायुषी आरोग्य मिळवा.

# सोयाबीन गर्भधारणा होण्यासाठी उपयुक्त



अनेक तरुणींना लवकर गर्भधारणा होत नाही व गर्भ राहिलाच तर गर्भपात होतो; परंतु यावर सोयाबीनचा उपयोग करुन फर्टिलिटी इलाज केल्यास गर्भधारणा होऊ शकते. सोयाबीनमुळे गर्भपात होत नाही व गर्भ राहतो. सोयाबीन गर्भपाताला कारणीभूत असलेल्या रासायनिक तत्वांचा नाश करतो, असा ब्रिटिश स्त्री तज्ज्ञांनी शोध लावला आहे. ज्या महिला आय.व्ही.एफ. करतात व तरीही गर्भ राहत नाही अशा महिलांनी सोयाबीनचा वापर केला असता त्या गर्भवती झाल्या व त्यांचा गर्भपातही झाला नाही. शास्त्रज्ञांच्या या संशोधनात असे आढळून आले की, इन्ट्रालिपिड, द्रव चरबी व जास्त कॅलोरीयुक्त खाद्य आय. व्ही. एफ. ट्रिटमेंट मानसिक व आर्थिकदृष्ट्या त्रासदायक ठरतात. कृत्रिम गर्भधारणा तज्ज्ञ रेन यांनी प्रायोगिक तत्वावर गर्भवती होण्यास निष्फळ ठरलेल्या महिलांचे अध्ययन केले. त्यात किमान सहा वेळा आय.व्ही.एफ. निष्फळ ठरलेल्या महिलांचा समावेश होता. एका महिलेचा तर १२ वेळा गर्भपात झाला होता व आय.व्ही.एफ. ट्रिटमेंटचा काहीही उपयोग झाला नाही, पण यापैकी निम्म्या महिलांनी सोयाबीनवर आधारीत ट्रिटमेंट घेतली असता त्याचा गर्भधारणा झाल्याचा या तज्ज्ञांनी दावा केला आहे. ■■■

# नुसतं सॉरी म्हटलं की विषय संपतो का ? एका संशोधनातून समोर आली आहे आश्चर्यकारक गोष्ट

तुम्ही एखाद्याची माफी मागता तेव्हा कधीकधी योग्य शब्द शोधणे कठीण होते; ज्यामुळे समोरच्या व्यक्तीला असे वाटेल की तुम्ही खरोखरच मनापासून क्षमा मागत आहात.

अलीकडेच झालेल्या संशोधनातून असे दिसून आले आहे की जर कोणी माफी मागितली तर लोकांना बरे वाटते आणि ते पुन्हा माफी मागणाऱ्या व्यक्तीला सहकार्य करण्याची शक्यता जास्त असते. परंतु तुमचा अचूक संदेश प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी तुम्ही काही भाषिक युक्त्या वापरू शकता. अलिकडेच झालेल्या एका संशोधनातून असे दिसून आले आहे की आपण निवडलेल्या शब्दांची लांबी, माफी किती प्रामाणिक आहे, हे निश्चित करते.

**माफी सोपी नसावी**

माफी मागणे अधिक पटवून देण्याचा एक मार्ग म्हणजे ती 'महागडी' बनवणे. जेव्हा माफी मागणारे पैसे, प्रयत्न किंवा वेळ खर्च करून खर्च सहन करण्यास तयार असतात, तेव्हा त्यांची माफी स्वीकारणे अधिक चांगले असते.




**खर्चिक माफी**

२००९ सालच्या एका अभ्यासात असे आढळून आले आहे की, अशीच सहज नुसती माफी मागण्यांपेक्षा, ज्या माफीसाठी पैसे मोजावे लागतात, त्या माफी मागण्यांमुळे लोक अधिक माफ करून टाकतात. असे असले तरीही माफी मागण्यासाठी प्रयत्न करण्याचे इतरही मार्ग आहेत.

**शब्दांची लांबी**

शब्दाची लांबी आणि सामान्यता ते बोलणे किंवा लिहिणे किती कठीण आहे यावर परिणाम करते. मोठ्या शब्दांना अधिक अर्थपूर्ण स्पष्टता आवश्यक असते. असामान्य शब्द लक्षात ठेवणे आणि बोलणे किंवा लिहिणे कठीण असते. म्हणून, जर एखाद्याला माफी मागण्यासाठी आणि पश्चात्ताप व्यक्त करण्यासाठी अधिक प्रयत्न करायचे असतील तर ते मोठे आणि कमी सामान्य शब्द वापरू शकतात.


**माफी मागणारी व्यक्ती लांब शब्द निवडते**

ते इतर शब्दांपेक्षा अधिक विशिष्ट असतात, म्हणजेच ते समजण्यास सोपे असू शकतात. मग माफी मागणारा हुशार माणूस असे लांब शब्द निवडू शकतो जे दुर्मिळ नसतात. ज्यामुळे त्याला माफी मागणे कठीण होते. पण ज्या व्यक्तीकडे माफी मागितली जात आहे त्याच्यासाठी नाही. ■■■

# सकारात्मक दृष्टीकोनाने यश मिळते

आपल्या व्यक्तिमत्त्वात अनेक सकारात्मक, उत्तम उपयुक्त असे घटक असतातच. फार तर ते सुप्त स्वरूपात असतील, एवढेच. आ सुप्त घटकांचा शोध घेऊन त्यांना जागे करणे, सक्रिय करणे, कोणासही शक्य असते. त्यानंतर माणसाचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व क्रमशः बदलून जाईल आणि तो यशस्वी होईल, एवढे खरे.

आजच्या धावपळीच्या जगात जो तो 'परफेक्ट' बनण्याचा प्रयत्न करीत असताना आपला 'कान्फिडन्स' (विश्वास) कसा वाढेल, याकडे लक्ष देतो. विश्वास ही एक अशी चावी आहे, जिचा वापर केल्याने आपल्या प्रगतीची कवाडे चुटकीसरशी खुली होऊ शकतात. पण ते म्हणतात ना की, अल्लाउद्दीनचा दिवा मिळाला तर जीवनच बदलून जाते. पण तो कुठे मिळतच नाही. अगदी याचप्रमाणे आत्मविश्वासदेखील प्रत्येकाकडे असतोच असे नाही. तो प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग ठरतोय असे नाही. याच कारणास्तव एक चांगला बुद्धिमान मनुष्य पात्रता असूनही तिथंपर्यंत पोहोचू शकत नाही जिथंपर्यंत त्याने पोहोचायला हवे होते. आपल्या व्यक्तिमत्त्वात आत्मविश्वास असेल, तर एक चांगली पोस्ट आपल्या हातून कुठेच गेली नाही, हे नक्की समजा !



० ''आपण स्मार्ट किंवा गुडलुकिंग नाही त्याचं काय ?'' हा विचार आपल्या डोक्यातून सर्वांत पहिल्यांदा काढून टाका. गुडलुकिंग नसल्याने आपण कॉन्फिडन्ट होऊ शकत नाही, हा आपला गैरसमज आहे. स्मार्टनेसमुळे आत्मविश्वास वाढतो हे नक्की; मात्र आपले विचार चांगले असतील, तर आपणही 'कॉन्फिडन्ट पर्सनॅलिटी' बनू शकता.

० आपले विचार हे नेहमी सकारात्मकतेला धरून असावेत. आपल्या डायरीच्या पानांवर आपल्या चुका वा स्वतःबद्दल वाईट-साईट लिहिण्यापेक्षा आपल्या हातून घडलेल्या चांगल्या कामांची नोंद करा.

० योग्य दिशा आणि सकारात्मक विचार बाळगणाऱ्या लोकांसोबत मैत्री करा.

० आरशासमोर उभे राहून स्वतःशी संवाद साधा. यावरून, आपण किती कॉन्फिडण्ट आहोत, याची आपली आपल्यालाच ओळख होईल.

० दिखाव्याला बळी पडू नका. आपल्याकडील बुद्धि-चातुर्याचा वापर करा. या वाक्याला आपल्या जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान द्या.

० उत्तम विचार राखणाऱ्या लोकांशी संवाद साधा. त्यांच्या संपर्कात राहा. त्यांचे बोलणे, अनुभव ऐकून-ऐकून इतरांशी संवाद साधण्याबाबतचा आत्मविश्वास तुमच्यातही जागृत होईल.

० मनुष्य करू शकत नाही, असे कुठलेच काम नाही. चंद्रावर पाऊल ठेवण्यापासून ते दरीखोऱ्यांत घर बांधण्यापर्यंतची अवघड कामं या मनुष्यानेच करून दाखवली आहेत. तुम्हीही मनात आणलंत, तर काहीही करू शकतात. फक्त कॉन्फिडण्ड.

# फोटोग्राफी

फोटोग्राफीचा शोध कुणी लावला ? आता हा प्रश्न ऐकून नाव आठवत असाल तर तुमची विकेट गेलेली आहे. कारण फोटोग्राफी शोधण्याचं श्रेय कोणा एका विशिष्ट माणसाकडे जात नाही. खूप माणसांनी एकत्र येऊन केलेल्या प्रयोगातून ती हळूहळू उत्क्रांती होत गेली. जोसेफ नाइसफोर नाइप्से (१७६५-१८३३) या फ्रेंच माणसानं नाव याबाबतीत प्रामुख्याने घेतलं जातं. पहिलं निसर्गदृश्य कॅमेऱ्यात यानं बंदिस्त केलं असं म्हणतात. मुख्य म्हणजे याने घेतलेला फोटो कागदावर टिकून राहिला. हा गृहस्थ जिथं रहायचा तिथं आजही एक पाटी लावलेली आहे. '१८२२ साली अप्रतिम फोटो काढणारा फोटोग्राफर' यानंतर १८३९ साली जॅक्सेस डॅग्युर्सच्या विशिष्ट पध्दतीमुळे फोटोग्राफी लोकांना कळू लागली.

# उच्चारलेला प्रत्येक शब्द प्रेरणादायी असायला हवा


आपण उच्चारलेला प्रत्येक शब्द हा आपल्या सहकाऱ्यांसाठी प्रेरणादायी असायला हवा आपल्या बोलण्यातून, आपण वापरत असलेल्या योग्य शब्दांतून आपले व्यक्तिमत्त्व खुलत असते. आपण, ज्या ठिकाणी, ज्या पदावर काम करीत असतो, त्या ठिकाणी आपल्या वागण्याबरोबरच आपल्या योग्य संभाषणातूनही आपल्या व्यक्तिमत्त्वाबाबतीतले मत ठरविले जात असते. आपण आपल्या सहकाऱ्यांसोबत आपल्या कार्यपद्धतीविषयी ज्या पद्धतीने आपले मत व्यक्त करतो, त्याचा वाईट किंवा चांगला परिणाम आपल्या व्यक्तिमत्त्वावर होत असतो. आपण बोलताना, व्यक्तीशी संभाषण साधताना ज्या शब्दांवर अधिक जोर देत असतो किंवा जे शब्द आपल्या बोलण्यात वारंवार येत असतात, त्याचा चांगला किंवा वाईट परिणाम आपल्या व्यक्तिमत्त्वावर होत असतो. आपल्याला हवे असलेले ध्येय गाठायचे असल्यास, आपल्या बोलण्यातील प्रत्येक शब्द हा सहकाऱ्यासाठी प्रेरणादायी असणे गरजेचे असते. आपण जे शब्द वापरू, त्यांचा इतरांवर परिणाम होतो, हे लक्षात ठेवणे जरुरीचे असते. आपल्या आजूबाजूला जे मोठ-मोठे बिझनेस टायकून आहेत, त्यांच्या जीवनशैलीकडे पाहून आपणास निश्चितपणे दिसून येते, की त्यांच्याकडे अशी कोणती तरी जादूची कांडी आहे,ज्यामुळे त्यांना हवे ते यश प्राप्त करून घेता येते. त्यांची ही जादूची कांडी म्हणजे त्यांच्याकडे असलेला संग्रह होय. अशा यशस्वी व्यक्तींकडे चांगल्या सकारात्मक शब्दांचे भांडार असते. अशा व्यक्तींकडे हवे ते साध्य करून घेण्यासाठी प्रेरणारूपी शब्दसंग्रह असल्याचे दिसून येतात.



मोठ्या व्यक्तींना 'प्रॉब्लेम' कशाला म्हणतात, हे अजिबात ठाऊक नसते. त्यांना, कोणतीही एखादी अडचण आल्यास अशा अडचणीतून आणखी काहीतरी चांगले घडून येण्याची संधी मिळाली, असे समजून ते अडचणींवर मात करून आत्मविश्वासाने पुढे जातात. आपल्या शब्दांतून हवे ते साध्य करून घेण्याची कला त्यांना अवगत असल्याने त्यांच्या आजूबाजूचे वातावरण, तिथे काम करणाऱ्या व्यक्ती यांच्यावर त्यांच्या बोलण्याचा प्रभाव पडतो. एखाद्या सामान्य व्यक्तीकडून किंवा एखाद्या ग्राहकाकडून टिका-टिप्पणी झाल्यास, त्याचा त्रास, करून न घेता, त्यातून आपल्याला अजून काही तरी शिकता आले, असे मानतात. भविष्यात येणाऱ्या चांगल्या-वाईट घटना त्यांच्याकडून मोठ्या धीराने व आत्मविश्वासाने सांभाळल्या जातात. एखादे ध्येय निश्चित केल्यानंतर, त्या ध्येयाचा पाठपुरावा करताना सकारात्मक विचारांची इतरांबरोबर देवाण-घेवाण करायला हवी. अशाने, दुसऱ्यांचे मनोबल वाढते. त्यांच्यात स्फूर्ती निर्माण होते. आपल्यातदेखील चांगले बोलणे रूजवायचे असल्यास, आपण बोलताना कोणकोणते शब्द वापरतो ते एका कागदावर लिहून काढावे. जमतील तेवढे आठवून चांगले पर्यायी शब्दसुद्धा दुसऱ्या कागदावर लिहावेत व दुसऱ्या दिवसापासून त्या शब्दांचा उपयोग आपल्या नेहमीच्या बोलण्यात करावा. असे केल्याने, आपल्यातील आत्मविश्वास जागा होऊन, आपणास इच्छित ध्येय गाठता येणे शक्य होईल, असे वाटू लागते. कालांतराने, आपलाच आपल्यावर विश्वास बसणार नाही, असे आपले वक्तृत्त्व, चातुर्य दिसू लागते आणि त्याचा फायदा आपणास क्षणोक्षणी जाणवू लागतो.

# स्त्रियांना जोडीदार कसा हवा असतो

पृथ्वीतलावरची सर्वात मोठी लढाईची मैदान म्हणजे पतीपत्नींची बेडरुम, असं म्हटलं जातं. इथल्या लढयांचे वार हिटलरच्या लढयांपेक्षा घातक आणि विषारी असतात. देशादेशांमध्ये खेळल्याजाणाऱ्या लढयांमध्ये दोन तुकडे ही पद्धत असते. तिथे एकाचा जय व दुसऱ्याचा पराभव, या सरळसोट पद्धतीने लढाईचा निकाल लागतो. जित आणि जेता, आपल्याला रीतीनं जगायला मोकळे होतात, निकाल काही लागो, त्यांना लढाईनंतरही घायाळ सैनिकांचं पुनर्वसन होऊ शकतं, संसाराला संघर्ष असा सरळ, सोपा नसतो. स्त्री व पुरुष या दोन मनुष्यप्राण्यांमधील हा सामना असतो. लढाईचा निकाल काहीही लागो, दोघंही घायाळ होतात, आणि तरीही दोघांना एकत्र राहणं भाग असतं. पतीपत्नींनी घटस्फोटाचाच निर्णय घेतला, तर गोष्ट वेगळी, पण खरं म्हणझे फार फार थोड्या जोडप्यांना घटस्फोटाचा काटेरी मार्ग तुडवायचा असतो.



तात्पर्य : पतीपत्नींनी आपापसातच समझोता करुन या दैनंदिन चकमकींमधून मार्ग काढला पाहिजे. आजच्या जीवनात अनेक प्रकारच्या ताणतणावांना, दमणुकीला आणि नैराश्याला सतत तोंड द्यावं लागतं. अशा परिस्थितीत हक्काची सोबत लाभली असेल, तर ती कशासाठी तोडायची ?

पतीपत्नी आपल्या जोडीदारावर नाही, तर परिस्थितीवर नाराज असतात. आणि तिचा राग नकळत एकमेकांवर काढतात, असं करणं हाही त्यांच्यातल्या प्रेमाचा, त्यांच्या नात्याचाच एक भाग आहे. प्रेमाचा अधिकार जरुर वापरावा, पण त्यासाठी जोडीदाराला शत्रू समजण्याची चूक चुकूनही करु नका. भांडणं पतीपत्नींमध्येच नाही, तर प्रत्येक नात्यात होतात. आईवडील, मुलं, भावंडं, इतर नातलग, शेजारी , मित्र, सहकारी, बॉस.. कोणत्या नात्यात किंवा संबंधात वादविवाद होत नाहीत, सांगा!

पण मतभेद आणि वादविवाद म्हणजे शत्रूत्व नव्हे. निसर्गाचा माणसांवर फार लोभ आहे. त्यामुळे त्यानं प्रत्येक मनुष्यप्राणी भिन्न स्वभावाचाा बनवला आहे. भिन्न स्वभावाची माणस एकत्र आली तर मतभेद असणारच; पण मतभेद हे कोणत्याही नात्यात, विशेषत: पतीपत्नीच्या नात्यात विघ्नकर्ते नसतात. मतभेद हे स्वतंत्र बुद्धीचं लक्षण आहे.

पतीपत्नींनी एकरुप झालं पाहिजे, ही अपेक्षा अगदी खुळचट व अतार्किक आहे. जुन्या काळातल्या जोडप्यांचं या बाबतीत वारंवार उदाहरण दिला जातं; पण ते साफ चुकीचं आणि फसवं आहे. त्या काळात पतीपत्नी जोडीदार नव्हते. त्याचं नात बरोबरीचं नव्हतं. ते

## नोटीस

मौजे आनंदवाडी ता.जामखेड जि.अहमदनगर यांच्या कार्यालयाकडून १५ वा वित्त आयोग सन-२०२४-२५ च्या खाली दिलेल्या कामाचे नोदंणीकृत कंत्राटदार (जि.प.अहमदनगर) यांच्याकडून बी-१ निविदा मागविण्यात येत आहे.

| अ क्र | कामाचे नाव | निविदा रक्कम | बयाना रक्कम | निविदा फी | ठेकेदाराचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे आनंदवाडी येथे रस्ता कॉक्रीटीकरण करणे. ता.जामखेड जि.अहमदनगर | ८०१०९/- | १ टक्का | २३९/- | ओपन |
| २ | मौजे आनंदवाडी येथे रस्ता मुरमीकरण करणे. ता.जामखेड जि.अहमदनगर | २८७६४/- | १ टक्का | २३९/- | ओपन |

निविदा फॉर्म व कामाच्या अटी, शर्ती बाबत माहिती ग्रा.पं. कार्यालयात दि.२७/०६/२०२५ ते दि.०३/०७/२०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुटटी वगळुन) मिळतील सीलबंद निवीदा दि.०३/०७/२०२५ रोजी वेळ सकाळी ११.०० वा ते दुपारी ३.०० वा पर्यंत स्वीकारण्यात येतील निवीदा स्विकारण्याचा आथवा नाकरण्याचा अधिकार ग्रा.पं. राखून ठेवत आहे. निविदा उघडण्याची प्रक्रिया त्याच दिवशी दुपारी ३.०० वा ग्रामपंचायत कार्यालय आनंदवाडी ता.जामखेड येथे पार पडेल निविदे सोबत १.नोंदणी प्रमाणपत्र जि.प.अ.नगर २.शासकीय कामाचा अनुभव ३.पॅन कार्ड, ४.जीएसटी ५.आयटी रिटन व आवश्यक कागदपत्र जोडावी. कामाची मुदत ६ महिणे राहील.

सही/-
ग्रामसेवक
ग्रामपंचायत आनंदवाडी

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत आनंदवाडी

## जाहीर नोटीस

मी, श्रीमती सुवर्णा दत्तात्रय सातव,रा.आव्हाळवाडी,ता.हवेली,जि.पुणे - ४१२२०७, हे जाहीर करून सांगते की, माझे पती श्री. दत्तात्रय जगन्नाथ सातव यांचे निधन झाले आहे. त्यांच्या नावावर असलेली बोलेरो पिकअप गाडी (क्र. MH 12 JF 2714, चेसिस क्र.MA1ZN2GHKD1A17580) माझ्या नावावर हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

या हस्तांतरणास कुणाला हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

पत्ता:
श्रीमती सुवर्णा दत्तात्रय सातव
आव्हाळवाडी, ता. हवेली, जि.पुणे - ४१२२०७

## श्रीराम फायनान्स लिमिटेड

SHRIRAM Finance | SHRIRAM City MONEY WHEN YOU NEED IT MOST

**नोंदणीकृत कार्यालय:** श्री टॉवर्स, प्लॉट नं. १४ए , साउथ फेज इंडस्ट्रियल इस्टेट, गुइंडी, चेन्नई ६०००३२ **शाखा कार्यालय:** चौथा मजला, विक्रम नंदाडेप, समोर. पत्रकारनगर, सेनापती बापट रस्ता, पुणे- ४११ ०१६ **वेबसाइट:** www.shriramfinance.in

### भौतिक ताबा सूचना

**टीप: या द्वारे सूचित करण्यात येते कि एनसीएलटी , चेन्नई यांच्या आदेशानुसार "श्रीराम सिटी युनियन फायनान्स लिमिटेड" चे "श्रीराम ट्रान्सपोर्ट फायनान्स लिमिटेड" मध्ये एकत्रीकरण करण्यात आले आहे, त्यानंतर नाव बदलाच्या अनुषांगाने ३०. ११. २०२२ दिनांकीत निगमन प्रमाणपत्रा अनन्वे दिनांक ३०. ११. २०२२ रोजी पासून "श्रीराम ट्रान्सपोर्ट फायनान्स लिमिटेड" चे नाव बदलून ते "श्रीराम फायनान्स लिमिटेड" असे करण्यात आले आहे.**

जसे की , निम्नस्वाक्षरीदार हे श्रीराम फायनान्स लिमिटेड (एसएफएल) प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट ॲक्ट, २००२ च्या (उक्त कायदा ) तरतुदींच्या अंतर्गत आणि उक्त कायद्याचे कलम १३ (१२) सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ ( उक्त नियम ) नियम ९ यांद्वारे मिळालेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी कर्जदार/ सह-कर्जदार / तारणकर्ता यांना ज्यांचे तपशील खालील कोष्टकात नमूद करण्यात आले आहेत, उक्त मागणी सूचनेत नमूद केलेल्या रक्कमेची परतफेड करण्यासाठी मागणी सूचना जारी केली होती.

कर्जदार/सह-कर्जदार/गहाणखतदार यांनी रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदार/ सह-कर्जदार/गहाणखतदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की श्रीराम फायनान्स लिमिटेड (एसएफएल) चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीकाराने सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (SARFAESI ॲक्ट) च्या कलम १४ अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली दिलेल्या तक्त्यामध्ये नमूद केलेल्या तारखांना, इतर सर्व तपशीलांसह, खालील तक्त्यात नमूद केलेल्या तारखांना, श्रीराम फायनान्स लिमिटेड (एसएफएल) चे अधिकृत अधिकारी म्हणून, प्रत्यक्ष ताब्यात घेतले आहे.

**कर्जदाराचे नाव व पत्ता**

**१. मेसर्स सुनीती डिझेल प्रायव्हेट लिमिटेड (त्याचे संचालक श्री. नितीन चंद्रकांत सोंडकर यांच्या मार्फत प्रतिनिधित्व)**
**नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता: ४७/३, पी. क्रमांक २, तावरे कॉलनी, पुणे सातारा रोड, (सिटी प्राइड समोर), पुणे - ४११ ००९**
**२. श्री. नितीन चंद्रकांत सोंडकर**
**३. सौ. सुनिता नितीन सोनडकर**
**दोघांचेही निवासस्थान पत्ता: घर क्रमांक २५९३,सर्वेक्षण क्रमांक २८/१, धनकवडी (चैतन्य नगर जवळ), ता. हवाली, जिल्हा पुणे, महाराष्ट्र - ४११०४३**

**मागणी सूचनेनुसार थकबाकी रक्कम**

कर्ज खाते क्र. CDPDCTF1410310001 अंतर्गत रु.
रु. १,९८,४४,४०८/- (रुपये एक कोटी अठ्याण्णव लाख चौचाळीस हजार चारशे आठ फक्त) संविदात्मक दराने पुढील व्याजासह, उक्त सूचना प्राप्त झाल्याच्या तारखे पासून ६० दिवसांच्या आत . मागणी सूचना दिनांक : ३०/१२/२०१७
भौतिक ताबा तारीख: २५-०६-२०२५

**मालमत्तेचे वर्णन**

जमिनीचा तो सर्व तुकडा आणि त्यावरील बांधकाम ज्यामध्ये तळमजला - दुकान आणि वरचा मजला / स्टिल्ट फ्लोअर आणि उत्तरेकडील बाजूस मोकळी जागा, एस. क्रमांक ४७, हिस्सा क्रमांक ३ ते १३/१+३, १५, १६ प्लॉट क्रमांक २, सीटीएस क्रमांक ३७४६, पार्वती, पुणे, प्रशासन क्षेत्र ५८२८ चौ. फूट चौ. फूट किंवा ५५९.४८ चौ. मीटर.
खालीलप्रमाणे सीमा: उत्तर: - रस्ता, दक्षिण: - सर्व्हे क्रमांक ४७, हिस्सा क्रमांक १७, पूर्व: - प्लॉट क्रमांक १, पश्चिम: - प्लॉट क्रमांक ३

कर्जदार/जामीनदार/गहाणखतदारांना विशेषतः आणि सर्वसाधारणपणे जनतेला येथे इशारा देण्यात येत आहे की त्यांनी वरील मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास श्रीराम सिटी युनियन फायनान्स लिमिटेड (एससीयूएफ) कडून येथे नमूद केलेल्या रकमेचा शुल्क आकारला जाईल आणि पूर्ण आणि अंतिम देयकेपर्यंत त्यावर करारानुसार व्याजदराने अधिक व्याज आकारले जाईल. कर्जदार/जामीनदार/गहाणखतदारांना कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (८) च्या तरतुदींकडे लक्ष वेधले जात आहे, सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात.

**ठिकाण :** पुणे
**दिनांक :** २५.०६.२०२५

**स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी**
**श्रीराम फायनान्स लिमिटेड**

## कला विश्व

### अवघ्या २५ व्या वर्षी झायेद खान याने विरोध असतानाही केले होते लग्न



लोकप्रिय अभिनेता शाहरुख खानचा 'मैं हू ना' हा चित्रपट त्याकाळी प्रचंड गाजला होता. त्यामधील शाहरुख खान व सुश्मिता सेन यांची ऑनस्क्रीन केमिस्ट्री प्रेक्षकांना खूप आवडली होती. परंतु, या चित्रपटात अजून एक जोडी होती ज्यांनी सर्वांचं लक्ष वेधलं होतं. 'मैं हू ना' या चित्रपटात अमृता राव व झायेद खान यांनी महत्त्वाच्या भूमिका साकारल्या होत्या. त्या काळी या जोडीनंसुद्धा प्रेक्षकांची मनं जिंकली होती. 'मैं हू ना' मधून शाहरुख खानसह झळकलेला अभिनेता म्हणजे झायेद खान. तो या चित्रपटातून खऱ्या अर्थानं प्रसिद्धीझोतात आलेला. त्याकाळी त्याची चित्रपटातील भूमिका अनेकांना आवडलेली. या चित्रपटात त्यानं शाहरुख खानच्या धाकट्या भावाची लक्ष्मणची भूमिका साकारली होती. चित्रपटातील त्याच्या भूमिकेचा मोठा चाहतावर्ग निर्माण झालेला. व्यावसायिक आयुष्यासह अभिनेता त्यावेळी त्याच्या खासगी आयुष्यामुळेही चर्चेत होता. याचं कारण म्हणजे अभिनेत्यानं वयाच्या अवघ्या २५ साव्या वर्षी लग्नगाठ बांधली होती. झायेद खाननं त्याची जवळची मैत्रीण मलायका पारेखसह लग्नगाठ बांधली होती. त्यावेळी त्यानं 'मैं हू ना', 'दस' या चित्रपटांमध्ये काम केलं होतं. अभिनेत्याचा मोठा चाहतावर्ग तर होताच; परंतु यामध्ये महिलांची संख्या अधिक होती. झायेद खानचा फिमेल फॅन फॉलोईंग खूप मोठा होता. त्यामुळे त्याच्या बायकोला या गोष्टीचा त्रास होत असे, असं त्यानं सांगितलं आहे. त्याबद्दल अभिनेत्यानं सिद्धार्त कननला दिलेल्या मुलाखतीमध्ये सांगितलं आहे. तो म्हणाला, माझा फिमेल फॅन फॉलोईंग जास्त असल्यानं माझ्या बायकोला यामुळे थोडा त्रास व्हायचा. तिला कधी असुरक्षित वाटलं नाही; पण तिला माझ्याशी याविषयी अनेकदा बोलावंसं वाटायचं आणि ते साहजिक आहे.

### अमिताभ बच्चन यांचा 'अग्निपथ' चित्रपट पाहून संतापले होते चाहते, चित्रपटगृहाचेही नुकसान



बॉलीवूडचे बिग बी अमिताभ बच्चन यांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक लोकप्रिय चित्रपट दिले. त्यापैकी काही हिट झाले, तर काही फ्लॉपही झाले. मात्र, त्यांच्या फ्लॉप चित्रपटांचीही बरीच चर्चा झाली होती. असाच एक चित्रपट म्हणजे 'अग्निपथ'. या चित्रपटानं म्हणावं तसं व्यावसायिक यश मिळवलं नाही; पण या चित्रपटाची, त्यातील अमिताभ यांच्या भूमिकेची सर्वत्र चर्चा झाली होती. या चर्चेचं आणखी एक कारण म्हणजे चित्रपट प्रदर्शित होताच प्रेक्षकांनी चित्रपटगृहं उद्ध्वस्त केली होती. ते का? तर या चित्रपटातला अमिताभ बच्चन यांचा आवाज प्रेक्षकांना आवडला नव्हता. 'अग्निपथ' चित्रपटातील अमिताभ यांची विजय दीनानाथ चौहान ही भूमिका चांगलीच गाजली होती; मात्र या भूमिकेसाठी त्यांनी विशेष आवाज वापरला होता. अग्निपथ हा चित्रपट प्रदर्शित झाला, तेव्हा अमिताभ यांचा चित्रपटातील बदललेला आवाज ऐकून प्रेक्षक संतापले आणि त्यांनी चित्रपटगृहांचं नुकसान केलं. अमिताभ यांचा मुलगा अभिषेक बच्चननं नुकतीच या संपूर्ण घटनेबद्दलची आठवण सांगितली. यावेळी त्यानं सांगितलं की, चित्रपटात अमिताभ यांचा बदललेला आवाज ऐकून प्रेक्षक इतके संतापले की, त्यांनी चित्रपटगृहांमधल्या खुर्च्या आणि साऊंड सिस्टीमचं नुकसान केलं होतं. इंडिया टुडेशी बोलताना अभिषेक म्हणाला, जेव्हा चित्रपट प्रदर्शित झाला तेव्हा असं वृत्त येऊ लागलं की, लोक चित्रपटगृहांमधील साउंड सिस्टीम तोडत आहेत. प्रेक्षकांना वाटलं की, अमिताभ यांच्या आवाजाला अचानक काय झालं आहे? त्यांना वाटलं की, स्पीकर्स बंद आहेत. अमिताभ बच्चन हे त्यांच्या एका विशिष्ट आवाजासाठी ओळखले जातात आणि म्हणूनच प्रेक्षकांना तेव्हा त्यांचा नवीन आवाज स्वीकारणं कठीण गेलं.

# राज्यात यापुढे पायाभूत सोयी सुविधेचा प्रकल्प तीन वर्षात पूर्ण करावा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## बोरिवली ते ठाणे दुहेरी बोगदा प्रकल्पाचा आढावा

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : राज्यात यापुढे कुठलाही पायाभूत सोयी सुविधेचा प्रकल्प रखडणार याची दक्षता घेत पुढील तीन वर्षात प्रकल्प पूर्ण करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. ठाणे ते बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करावे. दुहेरी बोगदा प्रकल्प डिसेंबर २०२८ पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

ठाणे ते बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्पाचा आढावा मुख्यमंत्र्यांनी आज विधानभवनातील कॅबिनेट सभागृहात घेतला. यावेळी ते बोलत होते. यावेळी बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, दुहेरी बोगदा हा ११.८४ किलोमीटर लांबीचा असणार आहे. त्यामुळे बोगद्यात हवा खेळती राहिली पाहिजे. त्यासाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानमधील अतिरिक्त जागा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही तातडीने करावी. प्रकल्पाच्या निर्मितीसाठी वन विभागाची दुसऱ्या टप्प्यातील परवानगी, रात्रीला काम करण्याची परवानगी घेण्यात यावी. बोरिवली बाजूकडील काम गतीने पुढे जाण्यासाठी आणि या बाजूकडील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी धडक कार्यक्रम राबवून एक महिन्यात कार्यवाही पूर्ण करावी.

यंत्रणांनी समन्वय ठेवून प्रकल्पग्रस्तांना भाडे देऊन अथवा अन्य गृहनिर्माण प्रकल्पात पुनर्वसनासाठी अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. सबंधित अधिकाऱ्याने एक महिना कारवाई करीत पुनर्वसन पूर्ण करावे. बोरिवली बाजूकडील अदानी, टाटा पॉवर प्रकल्पातील आवश्यक असलेल्या जमिनीचे संपादन करावे. तसेच भूमिगत वीज वाहिन्या टाकण्यासाठी अदानी पॉवर कंपनीला रस्त्याची अंतिम नियोजन द्यावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

बैठकीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांनी सादरीकरण केले. बैठकीस मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुंबई मनपा आयुक्त भूषण गगराणी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल, अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक रामराव, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान संचालक अनिता पाटील, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय जयस्वाल, ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे मनपा आयुक्त सौरभ राव आदी उपस्थित होते.

ठाणे ते बोरिवली दुहेरी बोगदा ११.८४ किलोमीटर लांबीचा आहे. प्रकल्प दोन पॅकेज मध्ये उभारण्यात येणार आहे. बोरिवली बाजूने ५.७५ किलोमीटर पॅकेज एक आणि ठाणे बाजूने ६.०९ किलोमीटर पॅकेज दोन असणार आहे. पॅकेज एक मध्ये ६ हजार १७८ कोटी आणि पॅकेज दोन मध्ये ५ हजार ८७९ कोटी अशाप्रकारे एकूण १२ हजार ५७ कोटी रुपयांचा खर्च या प्रकल्पाला अपेक्षित आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर कार्बन उत्सर्जन १.४ लाख मॅट्रिकने टन प्रतिवर्ष कमी होणार आहे. सध्याच्या रस्त्याने ठाणे ते बोरिवली जायला एक ते सव्वा तास लागतो. बोगदा पूर्ण झाल्यानंतर हा कालावधी १५ मिनिटांवरती येणार आहे. तसेच मोठ्या प्रमाणावर इंधनही वाचणार आहे.

# बांधकाम कामगारांची फसवणूक करणाऱ्या दलालांवर कठोर कारवाई

## कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या निर्देशानुसार दक्षता पथकांची स्थापना

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील बांधकाम कामगारांची बनावट कागदपत्रांच्या आधारे नोंदणी करून त्यांच्याकडून आर्थिक फसवणूक करणाऱ्या दलालांविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी कामगार मंत्री ड.आकाश फुंडकर यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राज्यातील विविध भागातून लोकप्रतिनिधी व बांधकाम कामगारांकडून तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. नोंदणी, कीट वाटप व अन्य बाबतीत गैरप्रकार होत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला असून आता राज्यभरात जिल्हास्तरावर दक्षता पथके स्थापन करून प्रभावी तपासणी मोहीम राबवण्यात येणार आहे. प्रत्येक विभागात, प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा कार्यालय प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक स्वतंत्र जिल्हास्तरीय दक्षता पथक गठीत करण्यात येणार आहे. या पथकांचे कार्यक्षेत्र मात्र त्यांच्या स्वतःच्या जिल्ह्याऐवजी दुसऱ्या जिल्ह्यावर असेल, जेणेकरून कारवाई अधिक निष्पक्ष आणि प्रभावी राहील.

दक्षता पथकांना नेमून दिलेल्या जिल्ह्यांमध्ये बनावट कागदपत्रांद्वारे होणारी नोंदणी, नोंदणीसाठी पैसे मागण्याचे प्रकार तसेच खोटी दाखले सादर करून मिळवले जाणारे लाभ या बाबींवर लक्ष केंद्रित करून तपासणी मोहीम राबवण्यात येणार असून संबंधित दलालांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात येईल.

या मोहिमेसाठी क्षेत्रीय कार्यालयांना वाहन भाडेतत्वावर घेण्याची परवानगी देण्यात आली असून, तपासणीसाठी आवश्यक इतर खर्चही प्रशासकीय निधीतून नियमानुसार करण्यात येणार आहे.

जिल्हास्तरीय दक्षता पथक प्रमुखांनी त्यांच्या कारवाईचा सविस्तर अहवाल विभागीय प्रमुखांना सादर करावयाचा आहे. विभागीय प्रमुख सर्व जिल्ह्यांचे अहवाल एकत्र करून आपल्या अभिप्रायासह मंडळ मुख्यालयास सादर करतील.ही विशेष तपासणी मोहीम प्रथम टप्प्यात १० जुलै २०२५ अखेरपर्यंत राबवली जाणार आहे. या तपासणी दरम्यान ज्यांना काही तक्रारी असतील त्यांना त्या दक्षता पथकाकडे देता येतील. प्रत्येक पथकाने दरमहा किमान एक तपासणी करणे बंधनकारक असून, त्या तपासण्यांचे संकलित अहवाल मंडळास दरमहा सादर करणे आवश्यक राहील. या निर्णयामुळे राज्यातील बांधकाम कामगारांची फसवणूक करणाऱ्या दलालांवर प्रभावी आळा बसेल, अशी अपेक्षा कामगारमंत्री ड आकाश फुंडकर यांनी व्यक्त केली आहे.

# महाराष्ट्र विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन ३० जूनपासून

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्र विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन ३० जून ते १८ जुलै २०२५ या कालावधीत मुंबईत पार पडणार असल्याची घोषणा विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत करण्यात आली.

विधानभवन येथे आयोजित विधानमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीला विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, उच्च व तंत्र शिक्षण व संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील, माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन,विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानसभा सदस्य सर्वश्री दीपक केसरकर, भास्कर जाधव, नितीन राऊत, जितेंद्र आव्हाड, अमीन पटेल, विधानपरिषद सदस्य सर्वश्री भाई जगताप, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, श्रीकांत भारतीय, संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत अधिवेशनाच्या नियोजनावर चर्चा करण्यात आली. विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे यांनी कामकाजाची माहिती दिली.

# सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट महाविद्यालयाला मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांची भेट

## आर्ट गॅलरीचे काम वेळेत पूर्ण करण्याचे दिले निर्देश

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट महाविद्यालयाला उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी भेट देऊन महाविद्यालय परिसरात सुरू असलेल्या इमारतीच्या बांधकामाची पाहणी केली.

यावेळी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उपसचिव संतोष खोरगडे, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई, महाविद्यालयाचे संचालक प्रा. राजीव मिश्रा, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी या महाविद्यालयात सुरू असलेल्या बांधकामाची पाहणी केली. काम दर्जेदार करावे आणि वेळेत पूर्ण करावे असे सांगून महाविद्यालयाच्या परिसरात असलेल्या दुर्मिळ व ऐतिहासिक चित्रसंग्रहाचे जतन आणि सादरीकरण यासाठी त्यांनी सीआरसी फंडाच्या माध्यमातून एक अत्याधुनिक आर्ट गॅलरी उभारण्याच्या प्रस्तावास मंजुरी देऊन या गॅलरीचे काम दि. ३० डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

# सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे ओगावा सोसायटीने ड्रॅगन पॅलेस परिसरातील काम करावे

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची सूचना

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : नागपूर जिल्ह्यात कामठी येथे ओगावा सोसायटीने ड्रॅगन पॅलेस परिसरातील जागेची उपयोगिता बदलून पर्यटकांची निवास व्यवस्था करण्याबाबत प्रस्ताव सादर केला आहे. यासाठी सामाजिक न्याय विभागाचे प्रादेशिक आयुक्त आणि ओगावा संस्था ही कार्यान्वयन यंत्रणा असेल. संस्थेने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे काम करावे, अशी सूचना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

ओगावा संस्थेच्या नवीन बांधकाम प्रस्तावाबाबत मंत्रालयात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी माजी राज्यमंत्री सुलेखा कुंभारे, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ.हर्षदीप कांबळे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, ओगावा संस्था ड्रॅगन पॅलेस परिसर विकसित करीत आहे. तेथील बांधकामाबाबत ओगावा संस्थेने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून काम करावे.

# विमान सुरक्षेसाठी पक्ष्यांचा वावर कमी करणाऱ्या नव्या संकल्पना, तंत्रज्ञान शोधा : मुंबई उपनगर पालकमंत्री आशिष शेलार



जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : पक्षांच्या धडकेमुळे हवाई वाहतुकीला होणारा धोका कमी करण्यासाठी बृहन्मुंबई महापालिकेने येत्या पंधरा दिवसात वर्सोवा कचरा हस्तांतरण केंद्राचे आधुनिकीकरण करुन त्याला छप्पर टाकण्याची निविदा काढून काम तातडीने सुरू करावे. तसेच विमानतळाच्या परिसरातील कचरा संकलन केंद्र व क्षेपण भूमीवर पक्षी येऊ नयेत, यासाठी उपाय योजना सुचविण्यासाठी शास्त्रज्ञ, पर्यावरणविषयक तज्ज्ञ तसेच तरुण अभ्यासकांकडून नव्या कल्पना जाणून घ्या, असे निर्देश सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान मंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री ड आशिष शेलार यांनी दिले. मुंबई विमानतळ परिसरात पक्षांच्या धडकेमुळे विमानांना होणारा धोका कमी करण्यासंदर्भात दि. २५ जून रोजी मुंबई उपनगर पालकमंत्री ड आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील दालनात बैठक झाली. यावेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विपीन शर्मा, अमित सैनी, अभिजित बांगर यांच्यासह भारतीय विमानतळ प्राधिकरण, नागरी विमान वाहतूक महासंचालनालय, मुंबई अग्निशमन दल आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

मुंबई विमानतळाच्या १० किलोमीटर परिसरात कचरा क्षेपणभूमी, कांदळवन अथवा वनक्षेत्र यामुळे पक्षांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे विमान वाहतुकीला धोका निर्माण होत असतो.

विमानाला पक्षी धडकण्याच्या घटना वारंवार घडत असून सन २०२० मध्ये २०, सन २०२१ मध्ये ३५, सन २०२२ मध्ये ३६, २०२३ मध्ये ६०, सन २०२४ मध्ये ५९ तर जानेवारी २०२५ पासून आजपर्यंत १९ पक्षी धडकल्याची नोंद झाली आहे. तसेच ठाणे खाडी परिसरात येणाऱ्या परदेशी पक्षांमध्ये वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे. सन २०१५ मध्ये १० हजार फ्लेमिंगो आले होते ती संख्या वाढली असून २०२४ मध्ये २ लाख फ्लेमिंगोची नोंद झाली आहे.

५० ते २०० फूट उंचीवर २०२४ मध्ये ३ पक्षी धडकले होते ५०० फूटापर्यंत १६ तर ५०० ते १००० फूटापर्यंत १३ धडकी झाल्या. ३ हजार पेक्षा जास्त उंचीवर ११ धडकी झाल्याच्या नोंदी झाल्या आहेत.

मुंबईतील देवनार, कांजूरमार्ग डंम्पिंग ग्राऊंड आणि वर्सोवा कचरा हस्तांतरण केंद्र हे विमानतळाच्या फनेल झोन मध्ये येतात. कचराभूमीत खाद्य मिळत असल्याने या परिसरात मोठ्या प्रमाणात पक्षांचा वावर असतो. त्यामुळे विमानतळावर उतरणाऱ्या व येथून उड्डाण करणाऱ्या विमानांना धोका पोहचतो. ही समस्या दूर करण्यासाठी कोणत्या उपाय योजना करण्यात याव्यात याबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली. विमानाच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही बाब अत्यंत महत्वाची असल्याने महापालिका याबाबत काय उपाययोजना करु शकते याचा आढावा घेण्यात आला.




* संपादक – संजय प्रल्हाद भोकरे * सरव्यवस्थापक – सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. एम्बसी सेंटर, प्लॉट नं. २०७, जमनालाल बजाज मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई, ४०००२१. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन – ०२०-२५४२४२३२ E-mail : sanjmaha@gmail.com